
# जय बजरंग



# जय बजरंग

पु. पां. गोखले

समाजभूषण बाबूराव गोखले स्मारक समिती,
पुणे विभाग

१२७०
११७३

प्रकाशक :
समाजभूषण बाबूराव गोखले,
स्मारक समिति, पुणे विभाग,
२७३, शनिवार पेठ,
पुणे ४११०३०

□

© सर्व हक्क सुरक्षित

□

प्रकाशन दिनांक :
५ डिसेंबर १९९८

□

अक्षररचना :
एच. एम. टाइपसेटर्स
११२० सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०

□

मुद्रक :
प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ, पुणे-३०

□

**मूल्य : २०/- रुपये**



# १. सूर्याकडे उडी

सुमेरू या सोनेरी पर्वतावर बलाढ्य वानरराज पिंगट व पीतवर्णी केसरी, राज्य करून राहत असे. त्याची घरधनीण होती अंजनी. ती कांतिमान् होती. ती गौतमाची मुलगी. तिला मनासारखा मुलगा हवा होता. म्हणून ती भगवान शंकराची पूजा व सेवा करी. रोज सकाळ-संध्याकांळ तिची प्रार्थना चाले, 'भगवान् मला वाऱ्यापेक्षा चपळ, वज्रापेक्षा बळकट, बृहस्पतीसारखा बुद्धिमान आणि तुझ्यासारखा परोपकारी मुलगा दे.'

शंकरांनी अंजनीवर कृपा केली. केसरी-अंजनीला एक मुलगा झाला. कोणी म्हणतात; चैत्र शुद्ध पौर्णिमेला, कोणी म्हणतात; अश्विन वद्य चतुर्दशीला, कोणी म्हणतात; कार्तिक शुद्ध पौर्णिमेला. कोणी तो वार शनिवार होता म्हणतात, तर कोणी मंगळवार. गणपतीप्रमाणेच मारुतीची जन्मतिथी अशी वेगवेगळी मानली

जाते. काही का असेना अंजनीचा मुलगा सूर्योदयाच्या वेळेला जन्माला आला, एवढे खरे.

अंजनी-केसरींचा आनंद मग काय पुसावा? कोठेही जाताना अंजनी त्या बाळाला पोटाशी बांधून येई. पुढे केसरी मुलाला पाठी घेऊन उड्डाण करी आणि मुलाच्या निरागस आनंदात तल्लीन होऊन जाई.

एक दिवस केसरी बाहेर काही कामासाठी गेला होता. त्याच्यामागून काही फुले-फळे जमा करून आणावीत म्हणून अंजनीही बाहेर पडली होती. घरी एकटाच हा मुलगा होता. त्याला भूक लागली. आकाशात त्याला लाल-लाल सूर्य दिसला. त्याने विचार केला की, 'हे फळ बरे आहे.' लोक म्हणतात सूर्यच जगाला जगवतो. याला वाटले, 'त्यालाच आपण खाऊन टाकले तर आपली भूकही भागेल व आपण नव्या तेजाने जग जगवू.'

सोन्याची अंडी घालणाऱ्या कोंबडीचे पोट फाडून टाकण्याच्या कल्पनेतील अडाणीपणाच अंजनीच्या मुलात त्या वेळी होता. पण ते समजावणार कोण? भावनेचा भर दांडगा होता. अंजनीच्या मुलाने घेतली की सूर्याकडे उडी!

जन्मल्यापासून त्याची चपळाई कमालीची होती. वाऱ्याला मागे टाकील अशी! म्हणून लोक त्याला मारुती म्हणत. त्याने सूर्याकडे झेप घेतली त्या वेळी मलय-हिमालय पर्वतावरील शीतल वारे वाहत होते म्हणून बरे! नाहीतर सूर्यकिरणांनी मारुतीची दशा काय केली असती! बोलून चालून कोवळे बाळ होते ते!

सूर्याला मारुतीच्या साहसाचे कौतुकच वाटले. मारुतीलाही आपला अंदाज चुकल्याचे कळून चुकले! दुरून डोंगर साजरे दिसतात. तसेच तेजस्वी पौरुषही! दुरून त्याचा विनय लक्षात येत नाही बघणारांच्या! अन् बघणारे त्या पौरुषाला कोपराने

खणण्यासारखी माती समजतात! साराच अडाण्याचा गाडा!!

सूर्य मनात म्हणाला की, 'साहसी पोरच थोर काम करतो. केव्हा केव्हा काळाला पुरून उरण्यासारखे करतो. आज हा मारुती उड्डाण करून मजकडे येत आहे अमावस्येला! त्याच्या अगोदरच राहू मला होता की नव्हता करून टाकण्यासाठी चाल करत राहिला आहे! अमृतमंथनाच्या काळापासून मी अजरामर असतानाही माझा हेवा राहू करीत असतो व आपणास वरचेवर सतावीत असतो! त्याला हे माझ्या रथावर येऊन बसलेले वानराचे पोर दिसले, तर राहूच्या गर्वाचे घर खाली होईल!'

आणि सूर्याचे अनुमान खरे ठरले. राहू सूर्यावर चालून आला, तर मारुतीनेच सूर्याची पकड घेतली! तशी राहूची गाळण उडाली. कशी तरी आपली सोडवणूक करून घेत राहूने धूमच ठोकली. थेट गेला तो इंद्राकडे. इंद्र आला आणि त्याने त्या सूर्य-राहूसारख्या थोरामोठ्यांशी अतिप्रसंग करणाऱ्या वानराला आपल्या हातातील वज्र फेकून मारले. त्याने मारुतीची डावी हनुवटीच तुटली म्हणाना! पण ती बड्या धेंडाशी झटापट करताना मारुतीला झालेली जखम होती, म्हणून मारुतीच्या साहसाच्या गौरवार्थ लोक त्याला 'हनुमान' म्हणू लागले.

हे सारे ठीक! पण वानराचे पोर बेशुद्ध झाले, त्यातून ते कसे निभावणार? ते नीट झालेच पाहिजे. कारण शंकराच्या शब्दासाठी वायुदेवाने आपली शक्ती त्या वानरपुत्राला दिली होती. 'जो जो जयाचा घेतला गुण। तो तो झाला पित्यासमान।।' या न्यायाने मारुतीची बेशुद्धी हा नुसता वायुदेवाचा अपमान नव्हता, तर भगवान महादेवांचाही उपमर्द होता. तो निपटून निघालाच पाहिजे. आपण तेजस्वीपणाने जगावे आणि दुसऱ्या तेजस्वियांचा पाणउतारा होऊ नये अशी काळजी घेऊन जगावे, तरच समाज करून राहाण्यात अर्थ. त्या ब्रह्मदेवाला हे समजत होते. म्हणूनच तो पुढे

झाला आणि हरप्रयत्नाने त्याने मारुतीची प्रकृती ताळ्यावर आणली.

मग ब्रह्मदेव म्हणाले, “मारुतीसारख्या साहसी पोरांना नीट वळण लावणे आणि त्यांना आपल्याजवळ जे सामर्थ्य असेल ते देणे जाणकारांचे, तेजस्वियांचे, वडिलधाऱ्या विद्वानांचे कर्तव्य नाही का? ते वेळच्या वेळी झाले नाही तर जीवनाला आवश्यक असणारा हृदयातील प्राणवायू, गुदद्वारीचा अपानवायू, बेंबीजवळचा समानवायू, कंठातील उदानवायू आणि सर्व शरीरास व्यापणारा व्यानवायू जिथल्या तिथेच गोठतील. त्यावर उपाय करणे विचारवंतांचे कर्तव्य आहे. तसे नसेल तर त्यांनी आपणास देव तरी का म्हणवावे?”

सर्वांना हे पटले. इंद्र म्हणाला, “याला वज्रासारखा तगडा करण्याची जबाबदारी मी घेतो. त्याला ‘वज्रहनुमान मारुती’ च मी म्हणत जाईन. लोक माझे ऐकतील.” त्यावर सूर्य म्हणाला, “मी याला माझ्यासारखा तेजस्वी करीन. हा जर माझ्याकडे शिकायला आला तर याचे अंतःकरण, बुद्धी आणि भावना यांना मी असा उजाळा देईन की अंधार अगर किल्मिष म्हणून कसे ते राहाणारच नाही. त्याची जगात ‘वाग्मी’ म्हणून कीर्तीच कीर्ती होईल.” वरुण पुढे आला आणि त्याने मारुतीला पाण्याचेच काय पण कसल्याही पाशाचे, बंधनाचे भय राहणार नाही, असा आशीर्वाद दिला. कुबेर, विश्वकर्मा, ब्रह्मदेव यांनीही मग मारुतीला आपल्या शस्त्रशक्ती व शहाणपणाचे साहाय्य सदैव राहील असा आशीर्वाद दिला.

‘साहसे श्रीः प्रतिवसति।’ म्हणतात, ते हे असे.

# २. खोडकर मुलाला शाळा लागली

मारुती मुळातच खोडकर! अंजनी व केसरी यांना अगदी नकोनकोसे करून सोडले त्याने! ऋषि-मुनी खरे म्हटले तर एकमार्गी. ते कोणाच्या अध्यात ना मध्यात!! आपला देवधर्म बरा की आपण बरे, एवढेच त्यांना ठाऊक, पण अंजनीचे हे बाळ त्यांनाही 'सळो-की पळो' करून सोडी. कोणाचे आसनच झाडाला टांगून टाकी तर कोणाचा कमंडलूच लवंडून देई. कोणाच्या मांडीवर बसून खेळे, तर कोणाची दाढी खाजवून पुन्हा लांब उभा राहून हसे!

चिमणेपणात हे सगळ्यांनी निभावून घेतले. 'स्वतोक पितरा रुचे जरिही कर्दमी रांगले!' असेच अंजनी-केसरीचे झाले होते. पण–

'बालपणी बालांची कोमल-तरुतुल्य बुद्धि वाकेल।' तो काळ आल्यावर मारुती हा काळजीचा विषय झाला, मुलाला शाळा लावण्याची वेळ आली. अंजनी-केसरीने प्रयत्न करूनही मारुती सरळ वाटेवर येईना. कोणी ऋषि-मुनी त्याला आपल्या शाळेत वा आश्रमात घेईनात.

तेव्हा चपराक बसल्यासारखी मारुतीची स्थिती झाली. 'शाळा शिकायला आणि जगाच्या धकाधकीत शहाणपणाने वागायला येईल, असा या मुलाचा मगदूरच नाही,' असे सारे शहाणे मानतात. म्हणून तो एकदम गंभीर झाला. फारसे बोलायचे नाही असे त्याने ठरविले; आपल्या अंगी अमका गुण आहे अशी कोणी आठवण दिली तरच तो गुण दाखवायचा असे त्याने ठरविले.

त्यामुळे आपला मुलगा एवढा तरी समंजस झाला, असे अंजनी-केसरींना वाटले. त्यांनी मग जगाला प्रकाश देणाऱ्या अखंड कर्मयोगी सूर्याच्या शाळेतच मारुतीला घालण्याचे ठरविले.

केसरीने मारुतीचे मौंजीबंधन केले. मारुती सूर्याच्या शाळेत गेला. हळूहळू सर्व वेद-वेदांगांचा अभ्यास त्याने केला. आणखीही अनेक कला सूर्याने त्याला शिकवल्या.

*'न ह्यस्य शास्त्रे सदृशोऽस्ति कश्चित्।*
*वैशारदे छंदगतो तथैव॥'*

अशा बिनतोड परीक्षेत तो उतरला. मारुती एवढा विद्वान झाला की पुढे त्याने व्याकरणावर ग्रंथ लिहिला. भारतातील अकरावा व्याकरणकार म्हणून त्याची ख्याती आहे.

शिक्षण झाल्यावर सूर्य मारुतीला म्हणाले, "माझा एक शिष्य सुग्रीव आहे. त्याच्याकडे तू जा. तुझ्या विद्वत्तेचे व कर्तृत्वाचे चीज तो करील. सुग्रीवाचा भाऊ वाली हा लंकेच्या रावणाला मिळाला आहे. खर दूषण, त्रिशिरा, शूर्पणखा अशी मंडळी दण्डकारण्यात रावणाने पसरून ठेवली आहेत. मारीच, सुबाहू अन् ताटका यांचा त्रास आता उत्तर भारताला होऊ लागला आहे. त्यामुळे ऋषि-मुनींचे यज्ञ-तप-जप तर नीट होत नाहीतच; पण सज्जनाला जगणे अवघड होऊ लागले आहे. यासाठी दण्डकारण्यात शांतता प्रस्थापित झाली पाहिजे. त्यासाठी मी तुला ऋष्यमूक पर्वतावर असलेल्या सुग्रीवाकडे धाडत आहे."

त्याप्रमाणे मारुती सुग्रीवाकडे गेला. त्या काळी वालीच्या हल्ल्याचा नेम नसल्यामुळे, सुग्रीव ऋष्यमूक पर्वतावर राहत असे. त्याच्याजवळ त्याचे दूरदृष्टीचे सचिव असत. गुरुदेव सूर्याच्या आज्ञेने, आपल्याकडे आलेल्या मारुतीला सुग्रीवाने ठेवून घेतले. सहवासाने मारुतीच्या विद्वत्तेचा, चतुराईचा व सामर्थ्याचा परिचय सुग्रीवास झाल्यावर, मारुती सुग्रीवाचा अंतरंग-विश्वासातील मंत्रीच होऊन गेला.

❀ ❀ ❀

# ३. रामचरणी लीन

एक दिवस सुग्रीव आपल्या स्नेहीसल्लागारांसह काही राजकारणाची चर्चा करीत होता. चर्चा ऐन रंगात आली आणि एवढ्यात...

एवढ्यात सुग्रीवाची नजर सहज पंपासरोवराकडे गेली! आणि तो थोडासा चपापलाच. पंपासरोवरावर त्याला दोन सशस्त्र पुरुष आढळले होते. कोणत्या उद्देशाने ते आले असावेत? ते काही शोधाशोध करावयाला तर आले नसतील ना? त्यांची चालण्याची ढब, त्यांच्या शरीराचा रुबाब, त्यांच्या जवळची शस्त्रे-अस्त्रे पण त्याबरोबरच त्यांच्या अंगावरील वल्कले पाहून त्याचे मन साशंकच झाले. तेव्हा तो मारुतीला म्हणाला, "हनुमंता, ते दोघे कोण आहेत, त्यांचा माग काढून ये. ते कोणी शत्रुपक्षाकडील असतील तर, आपल्या संरक्षणाची बळकटी केली पाहिजे. तिसरेच कोणी असतील तर त्यांचा काही उपयोग झाला तर केला पाहिजे. मित्रा, यासाठी प्रथम शोध घे आणि योग्य असेल तो इशारा कर."

मारुती मग ब्राह्मण म्हणून पंपासरोवरावर गेला. रीतसर नमस्कार करून, हवापाण्याची चौकशी करता करता, त्या दोघा वीरतापसांचा मारुतीने परिचय करून घेतला. मारुती म्हणाला, "आपली ही शस्त्रास्त्रे आणि शरीराची वीराला साजणारी ठेवण पाहिली, म्हणजे आपण कोणी क्षत्रियकुलवंत आहात, असेच अनुमान होते. आपल्या पायांची कोमलता लक्षात आली की आपण कोणी राजबिंडे आहात अशी खात्री पटते. जंगलात अगर पहाडात राहण्याचा सराव तरी आपल्याला कसा असणार? अशा स्थितीत आपल्या अंगावरील वेष पाहिला की आपण ऋषिकुमार असावेत, असे मन सांगते. तेव्हा पाहाणाराने समजावे काय? आपल्या तोंडावरील तेज खात्री पटवते की आपण जनसामान्य खास नाही. जग चालविणाऱ्या

ब्रह्मा-विष्णु-महेशांपैकी तर तुम्ही कोणी नाही? का आपण साक्षात् नर-नारायणच आहात? आपल्या मधुरसुंदर चालचलणुकीने मी तर गुंगच झालो आहे. इतका की आपली माझी पूर्वजन्माची ओळख असल्यासारखे मला झाले आहे. आपण माझे समाधान करण्याची कृपा कराल काय?''

ती तापसांची जोडी म्हणजे चौदा वर्षे वनवास करावयास आलेले राम-लक्ष्मण होते. मारुतीचे बोलणे राम हसतमुखाने लक्षपूर्वक ऐकत होते. त्यांनी लक्ष्मणाकडे तोंड वळवून सांगितले की, ''हा ब्राह्मण मोठा बुद्धिमान दिसतो. याच्या बोलण्यावरून कळून चुकते की याने वेदांचा सांगोपांग अभ्यास केला आहे. याच्या बोलण्यात चूक कशी ती नाहीच! याच्या अंगविक्षेपात देखील असे काही आढळले नाही की याच्यात काही लपवालपवी असेल! हा कोणत्याही राजाचा मंत्री होण्याच्या योग्यतेचा दिसतो. याची बोलण्याची ढब, याची नीतिमत्ता ही दोन्ही प्रभावशाली आहेत.''

रामाच्या या बोलण्यातून लक्ष्मण काय समजायचे ते समजला. तो त्या ब्राह्मणास म्हणाला, ''ब्राह्मणदेवा, आम्ही दोघे अयोध्येच्या दशरथराजांचे चिरंजीव आहोत. त्यांच्याच वचनाकरता आम्ही चौदा वर्षे वनवास भोगावयाचे पत्करून इकडे आलो आहोत. इकडील एका राक्षसाने जनकासारख्या युगपुरुषाची कन्या सीतामाई हरण केली आहे. तिच्या शोधार्थ आम्ही हिंडत आहोत. रानावनांतून हिंडत असता दनू नावाचा एक दितीचा पुत्र भेटला. त्याने आम्हाला सुग्रीवाचे नाव सांगितले व त्याचे साहाय्य घेण्याचा सल्ला दिला. सुग्रीवाच्या शोधार्थच आम्ही इकडे आलो आहो. आपले शुभनाम काय?''

मारुतीने ब्राह्मणवेश उतरला. तो रामचरणी लीन झाला. म्हणाला, ''मी वेष पालटून आलो, यात आपल्याशी कपट खेळण्यासारखे

झाले, म्हणून का रामा, आपण माझ्याशी एकही शब्द बोलला नाहीत? क्षमा करा, देवा क्षमा करा.''

रामाने मारुतीला उठवले. त्याला हृदयाशी धरले आणि त्याचे अश्रूही पुसले. तेव्हा मारुती म्हणाला, ''मी सुमेरू पर्वतावरील केसरींचा मुलगा. अंजनी माझी आई. सूर्य माझे गुरू. त्यांनी आज्ञा केल्यावरून मी सुग्रीवाजवळ येऊन राहिलो आहे. ज्याने सीतामाईला पळवून नेले त्या रावणाला सुग्रीवाचा भाऊ वाली सामील आहे. तेव्हा आपण सुग्रीवाच्याकडे चलावे. रावणाने सीतेचे, तसेच वालीने सुग्रीवाच्या पत्नीचे अपहरण केले आहे. आपण व सुग्रीव समदुःखी. त्याच्या व आपल्या समान शत्रूला आपणा दोघांच्या सहकाराने शासन झाले तर दण्डकारण्यातील ऋषिमुनींचा त्रास दूर होईल.''

रामाने ही विनंती मान्य केली. रामलक्ष्मणांना आपल्या दोन्ही खांद्यावर बसवून मारुतीने त्यांना सुग्रीवाकडे नेले.

❀ ❀ ❀

# ४. सीतेचा शोध

बैठकीवर बैठकी झाल्या. राम-सुग्रीवांची मैत्री जमली. अग्नीला साक्ष ठेवून ती मैत्री पक्की करण्यात आली. रामाने मग वालीला परलोक दाखवला आणि सुग्रीव निर्धास्त झाला. सुग्रीव किष्किंधेला राज्य करू लागला, पण रामासाठी सुग्रीवाने काय केले? 'अवघे जग हे दिल्या-घेतल्याचे.' चार महिने सीता-शोधासाठी सुग्रीवाकडून कसलीच हालचाल नाही असे पाहून लक्ष्मण रागावला!

सुग्रीव स्वस्थ दिसला तरी मारुती मुकाट बसला नव्हता. प्रवर्षण-गिरीवर राम-लक्ष्मण राहत. तेथे त्यांना निरोप आला की, लंका धुंडून सीतेचा शोध लावण्यासाठी महेंद्र, हिमालय, विंध्य,

कैलास व मंदराचल यांच्या परिसरात राहाणाऱ्या सर्व पराक्रमी वानरांची व अस्वलांची एकेक पलटणच मारुतीने सुग्रीवासमोर उभी केली आहे. राम-लक्ष्मण सुग्रीवाकडे गेले. तेथे त्यांच्यासमोरच सुग्रीवाने वानरसेनेला देशांतर्गत बारीक-सारीक माहिती सांगून सीतेच्या शोधाची आराखडा-आखणी समजावून सांगितली. नंतर शासकीय आज्ञेच्या काटेकोरपणाने त्याने बजावले की, "एक महिन्याच्या आत सोपवून दिलेल्या स्थळांमध्ये शोध करून जो परतणार नाही तो कठोर शिक्षेस पात्र ठरेल!"

मग जांबुवंत, हनुमान, अंगद, नल यांना बोलावून सीतेच्या शोधाचे गांभीर्य सुग्रीवाने समजाविले. मारुतीला 'अशक्य' असे काहीच नव्हते. तेव्हा सुग्रीव त्याला म्हणाला, "हनुमाना, पाण्यात, पृथ्वीवर, आकाशात तुला सारखाच संचार करता येतो. तुझी गती रोखू शकेल असा या जगातच कोणी नाही. तेव्हा तुझ्यावर आमचा विशेष भर व भरंवसा आहे."

रामाने मग मारुतीला जवळ बोलावले. म्हटले की, "तूच सीतेचा शोध लावशील. पण तू माझाच माणूस आहेस, हा सीतेला विश्वास येण्यासाठी माझी ही अंगठी घेऊन जा."

रामाला वंदन करून मारुती निघाला.

❀ ❀ ❀

# ५. शोध लागला

अंगद, जांबुवंत, हनुमान सगळे सगळे सीतेचा शोध लावायला निघाले, भूक नाही की तहान नाही; सीतेच्या शोधाशिवाय त्यांना दुसरे काही सुचतच नव्हते. निराशाच पसरू लागली होती. पण–

एके दिवशी एका भीषण पर्वताच्या उंचच उंच टोकावर मारुती चढला होता. त्याला आढळ झाला की, काही सुंदर सुंदर पक्षी

आपले पंख झाडीत चालले आहेत अन् त्यांच्या पंखांवरून पाण्याचा शिडकावा होत आहे. मग त्याला सहजच वाटले की जवळच कोठेतरी फळाफुलांची बाग असावी आणि जलाशय किंवा तलावही असावा. सगळ्यांना बोलावून घेऊन मारुती ते हुडकू लागला.

शोधांती कळले की सारे पक्षी एका गुंफेतून बाहेर पडले आहेत. मग 'एकमेका सहाय्य करू। अवघे धरू सुपंथ!' या वचनाप्रमाणे रामाचे नाव घेऊन सारे घुसले गुंफेत!! तेथून झरणारे पाणी अमृतासारखे गोड होते, झाडे सोन्यासारखी होती, त्यांना लटकलेली फळे पौष्टिक होती, पण तेथे होती एक तपस्विनी. तिला सगळ्यांनी नमस्कार केला; तिची आज्ञा घेतली, आणि फळे खाऊन व पाणी पिऊन सगळ्यांनी समाधानाचा ढेकर दिला.

परत फिरावयाचे तर ती स्वयंप्रभा तपस्विनी प्रवर्षण पर्वतावर मला रामाचे दर्शन घडवा, असा आग्रह धरून बसली. तेव्हा अंगद म्हणाला, "सुग्रीवमहाराज मला सुळी देतील! सीतामाईचा शोध न लावता, नाही ते उद्योग काय करीत बसलात? असा बोल लावतील."

मारुती उत्तरला, "युवराज, असे काही व्हावयाचे नाही. खरे सांगितले म्हणज़े प्रभू रामचंद्र क्षमाच करतील आणि केलेल्या परिश्रमाबद्दल कौतुक करतील."

याचवेळी संपाती तेथे आला. संपाती हा जटायूचा भाऊ. सीतेला रावण नेत असता जटायू तिला सोडविण्यासाठी रावणावर तुटून पडला होता व त्या झगड्यात मेला होता. हे सर्व सांगून संपातीने सीतेचा पत्तासुद्धा सांगितला.

सर्व वानर-अस्वल आनंदले, पण समुद्रपार जायचे कोणी व कसे? जो तो आपापली शक्ती अजमावू लागला. कोणी म्हातारपण, तर कोणी उमेदवारीतील अतिरेक, अशा अनेक कारणांनी हात जोडून बसले किंवा बसवण्यात आले. तेव्हा मारुती पुढे आला

आणि म्हणाला, "वाटाघाटीने वाट निघत नाही. तेव्हा तुम्ही सर्वजण या गुंफेतील तपस्विनीला रामदर्शन करवा. मी घेतो सीतेचा शोध. नका करू काळजी!"

सगळी मंडळी मग आपापल्या कामाला लागली.

मारुती उंचच उंच अशा महेंद्र पर्वताच्या शिखरावर चढला. 'पायातळि कापे धरणी' अशी त्याची चढाई. देव जयजयकार करू लागले, ऋषिमुनींनी शांतिपाठ सुरू केला व हनुमंताने उडी मारली.

❀ ❀ ❀

## ६. लंकेचा किल्ला

मारुतीची उडी पडली ती मैनाक पर्वतावर. समुद्रातून मधेच तो वर आलेला. मारुतीला वाटले की हे नवीनच विघ्न आहे! तेव्हा मैनाक पर्वत मारुतीला म्हणाला, "बाळा, तू माझ्या मित्राचा मुलगा. इंद्राने पर्वतांचे पंख तोडले, तेव्हा वायुदेवाची मदत मला झाली आणि समुद्रात दडी दिली. वायुदेवाने आपली शक्ती तुला दिली आहे. तू त्याचा मानसपुत्र आहेस. आज प्रभू रामचंद्रांची सेवा करीत आहेस. रामाचे काम म्हणजे जगाचे सुखधाम. त्यात होईल तेवढे साहाय्य करण्यासाठी मी समुद्रातून वर आलो आहे."

मारुतीने मग मैनाक पर्वतास वंदन केले. गोंजारले व आपली लाथ त्याला लागली म्हणून क्षमा मागितली. आणि काय? सरळ निघालाच लंकेकडे! लंकेच्या सीमेवर उभ्या असलेल्या पहाडावर स्वारी उभी राहिली. त्याच्या दृष्टीस एक सुंदर वन दिसले. हिरवीहिरवीगार वनश्री, सुगंधित फुले, पक्ष्यांचे कलरव, भुंग्यांचे गुंजारव यांनी मारुती खूपच खूष झाला. तळ द्यावयास ते स्थान सर्वथा ठीक आहे असे त्याच्या मनाने घेतले. कारण तेथून लंकेतील सगळे काही नजरेत भरत होते. लंकेचा किल्ला मोठा मजबूत

आढळल्यामुळे, त्याच्या भागविभागांचा निरीक्षणपूर्वक अभ्यास करण्याचे त्याने ठरविले.

❀ ❀ ❀

## ७. अचानक विघ्न आले

मारुती लंकेकडे निघाला. पण टिकेल का तो लंकेच्या राक्षसी कचाट्यात? नागमाता सुरसाला चिंता पडली. हातच्या कांकणाला आरसा कशाला? म्हणून तीच राक्षसीचा अवतार घेऊन मारुतीच्या मार्गात आडवी झाली. म्हणाली, "बरा सापडलास आज माझ्या कचाट्यात! मी आज तुझा चट्टामट्टा करून टाकते!"

"मी निघालो आहे रामाच्या कामाला. तू ज्या भागात राहतेस तो आहे रामछत्राखाली. तेव्हा रामाच्या कामाला तूच विघ्न करणार?"

"काही बोलू नको. माझे काम मी करणार, तुझे तू कर. लहान तोंडी मोठा घास घेऊन मला तत्त्वज्ञान शिकवू नकोस."

"बरे तर! होऊन जाऊ दे!" मारुतीने उत्तर केले. मारुती मग



सुरसेच्या विशाल तोंडात उतरला. अंग चोरत चोरत तिच्या तोंडाच्या निमुळत्या बाजूने निसटला आणि म्हणाला, "राम, राम! आईसाहेब, मी जातो आपल्या कामाला."

सुरसाने त्याला आनंदाने निरोप दिला. मारुतीचा आत्मविश्वास वाढला. तो पुढे सटकला. लंकेच्या परिसरात पोहोचणार तर दुसरी बया त्याला खाऊ की, गिळू करू लागली! मारुतीने न्याहाळून आकाशातून पाहिले तर ती सिंहिका राक्षसी. आकाशातून उडणाऱ्याची छाया तिच्यावर पडली की, त्याला गळल्यासारखे होई आणि तो तिच्या तोंडात गडपच होई!! मारुतीच्या ते लक्षात आले. त्याने तिचे मर्मस्थान न्याहाळले. त्या मर्मावर तो उतरला. ती चिडली. त्याला गिळण्यासाठी तिने आपला जबडा मोठा केला. मारुतीने आपल्या धिप्पाड शरीराने तो जबडा असा घुसळला की ती सिंहिका होत्याची नव्हती झाली!

राक्षसी म्हणून मारुतीला भेटलेल्या या पर्वताच्या प्रचंड दऱ्याच नव्हत्या काय? सुरसेच्या व विशेष तर सिंहिकेच्या टप्प्यापर्यंतच आकाशातून उडणारांनाही पार दमावयास होत असे.

❀ ❀ ❀

## ८. अशोकवनात प्रवेश

मारुतीने लंकेची वेस गाठली. सायंकाळची वेळ होती ती. लंकेत हा अंग चोरून चोरून घुसणारा कोण? लंकिनी देवीला हा प्रश्न पडला. तिने "कोण रे तू?" असा मारुतीला प्रश्न केला. मारुती बोलतो आहे कशाला? त्याने एका ठोशाने तिला उत्तर दिले. बिचारी लागली रक्त ओकायला! शेवटी किंचाळली, "लंकेच्या रावणाचे आता मरण ओढवले खास! होणारे न चुकेल होईल जरी तया आडवा!"

थांबतो आहे कशाला मारुती! तो लंकेत शिरून बारीक नजरेने सर्व हेरू लागला. राक्षसांचे आहार, विहार, त्यांची वस्त्रागारे, मंत्रणागृह, छावणी सगळे सगळे पाहून घेतले मारुतीने! राक्षसराज रावणाच्या अंतःपुराचाही त्याने तपास घेतला. तेथे त्याला राणी मंदोदरी वगैरे सतींचे दर्शन झाले, पण त्याला त्याची काय मातब्बरी? त्याला हवे होते सीतादर्शन!

त्यासाठीच तो पुढे सटकला. त्याला एक झोपडी आढळली. त्या झोपडीच्या भिंतीवर 'रामनाम'च लिहिले होते. भोवताली तुळशीची रोपे होती; सुवासिक फुलझाडे होती, झोपडीसमोर प्रभुरामाच्या धनुष्यबाणांची चिन्हे असलेले एक मंदिर होते. मारुतीला आश्चर्य व आनंद वाटला. पहाटेच्या वेळी 'रामभजन' ऐकू येऊ लागले. मारुतीने रामनामाचा गजर केला. त्याबरोबर झोपडीतून एक सत्पुरुष बाहेर आला.

दोघांची दृष्टादृष्ट झाली आणि दोघे एकमेकांच्या गळ्यात पडले. कारण दोघेही रामभक्त होते. मारुतीला बिभीषण भेटला. मारुतीने आपण लंकायात्रा का केली ते सांगितले. सीतेचा शोध हवाच, अशी तळमळ दाखविली. त्यावर बिभीषण म्हणाला की, "दाताखाली जीभ राहते, तसा मी या लंकेत राहत असतो! मजवर भगवान् रामचंद्र केव्हा कृपा करणार? आज तुझ्यासारख्या रामभक्ताची गाठ पडली, तेव्हा माझे नशीब उघडायला सुरुवात झाली आहे असे मी समजू का?"

हनुमान म्हणाला, "काळजी का करतोस? ज्या देवाने माझ्यासारख्या वानराला जवळ केले, तो तुला का दूर लोटील? मला आता आधी सीतामाईचा ठावठिकाणा सांग." बिभीषणाने मारुतीला अशोकवनाची माहिती दिली. मारुतीने लगेच अशोकवन गाठले.

❀ ❀ ❀

# ९. ओळख पटली!

सीतामाई अशोकवृक्षाखाली बसलेल्या आढळल्या. त्यांचे शरीर सुकून गेलेले होते. केसांच्या जटा झाल्या होत्या; तोंडी अखंड रामनाम होते. मारुतीने त्यांना लांबूनच ओळखले व मनोमन नमस्कार केला.

मग एका शिसवीच्या झाडावर उंचच उंच बसून मारुती सीतामाईंना समक्ष भेटण्याची संधी पाहू लागला. 'नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्ने' तशी शत्रूच्या गोटात सीतामाईची गुप्त भेट घ्यायलाही.

रावणमहाराज आले, त्यांनी सीतेची आर्जवे केली, मोह घातले, धमकावण्याही दिल्या; पण सीतामाईंची पवित्रता, दृढ निश्चय, मेरूसारखी अढळ रामनिष्ठा पाहून रावणमहाराज आले तसे परत गेले. अनेक राक्षसींनी मग रावणाची तारीफ करून सीतीने रावणाला अनुकूल व्हावे म्हणून पराकाष्ठा केली, पण तोंडपुज्यांच्या लाळघोटणीने का सत्त्व पाघळते? सीतामाईला या प्रकारांनी कष्टच कष्ट होत होते. रामाचा मागमूस न लागल्याकारणाने त्यांचे काही बरे-वाईट नाही ना झाले?' अशी शंकाही सीतामाईंना भेडसावी. त्रिजटा नावाची राक्षसीच तेवढी सीतामाईंना सांगे की, "मला स्वप्न पडले आहे की राम लवकरच येतील व आपल्या राणीला सोडवून नेतील."

मग हळूहळू सगळ्या गेल्या. सीतामाईंना एकट्याच पाहून मारुतीने सीतामाईंसमोर उडी मारली, त्यांना नमस्कार केला व सांगितले की, "मी रामदूत हनुमान तुजसाठी सर्व शोधिली लंका।।"

ही अमृतवाणी ऐकून सीतेचे डोळे चमकले, पण दुसऱ्याच क्षणाला मनाने शंका घेतली की 'ही आणखी एखादी राक्षसी माया तर नसेल?'

मारुतीने लगेच ती शंका ताडली व प्रभू रामचंद्रांनी दिलेली अंगठी पुढे करून सीतामाईंची स्वतःसंबंधी खात्री पटवली. सीतामाई म्हणाल्या, "बाळा हनुमंता, आज तू माझ्या ज़िवात जीव आणलास. माझी आठवण प्रभूंना आहे; खरी भाग्यवती ठरले मी. ते केव्हा येणार व माझी सोडवणूक करणार?"

हनुमान म्हणाला, "माई, रामांना आपल्या वियोगाने 'काय होत आहे हे मी शब्दांनी कसे सांगू? आपल्यावाचून फुले-फळे देखील रामांना रसहीन वाटतात. चंद्राची किरणे त्यांना आगीच्या ज्वाला वाटतात. ढगातून पडणारे पावसाचे थेंब अंगावर घेण्यातील मजा बाजूला राहून तापलेल्या तेलाचे ठिपके पडल्यासारखे त्यांना वाटते. शीतल मंद वारादेखील साप-नागांच्या फूत्कारासारखा त्यांना वाटत असतो."

बोलता बोलता मारुतीचे अंतःकरण भरून आले. शेवटी मारुती म्हणाला, "माई, काळजी करू नका. आतापर्यंत आपला शोधच लागत नव्हता! आता रामबाणापुढे या राक्षसांचा चक्काचूर होऊन जाईल." सीतामाईंनी समाधानाचा एक सुस्कारा सोडला. हनुमान मग म्हणाला, "माई, आपली संमती असेल तर मी माझ्या खांद्यावरून आपणास रामचरणी सुखरूप सादर करतो."

सीता म्हणाली, "हनुमंता, तुझी शक्ती अग्नीसारखी तेजस्वी व वाऱ्यासारखी वेगवान आहे. तुझ्या पाठीखांद्यावरून जाताना मलाच भोवळ आली तर? शिवाय राक्षस का मग गप्प बसणार आहेत? त्यांच्याशी तुला सामना करावा लागेल! शिवाय प्रभूंच्या संमतीवाचून मी येणे व तू मला नेणे शोभणारे नाही! प्रभूनी माझा शोध तुझ्यामार्फत घेतलाच आहे. पुढची आखणी त्यांनी केलीच असेल की! प्रभू तुझे कल्याण करोत."

सीतामाईंना त्रिवार वंदन करून मारुती रामाकडे बातमी देण्यास निघालासुद्धा!

# १०. जंबुमाळी वध

सीतेचा निरोप घेऊन मारुती निघाला तो राक्षसांना आपला प्रताप दाखवीतच! कारण तो रामाकडचा कोणी हेर असून त्याने सीतेची गाठ अशोकवनात घेतली अशी वार्ता रावणापर्यंत पोहोचली आणि त्यानुसार रावणाने आपले जवानमर्द मारुतीला पकडण्यासाठी चहूकडे सोडले होते.

मारुती चैत्यप्रासादाशेजारी आला. लंकेच्या देवतेचे एक रम्य मंदिर होते. त्याचा तट भक्कम होता. मंदिराच्या दरवाज्याची गणेशपट्टी हलवून मारुतीने दरवाजाच काढून टाकला. राक्षसगण चवताळून चवताळून मारुतीवर उसळतच होते. तरीही मारुतीने मंदिराचा कळस काढून त्याचे कमलचक्र गदेसारखे गरगर फिरवले. तसा त्या कळसाने अग्नी प्रगट केला. मग ते अग्निदिव्य मारुतीने जसेच्या तसे ठेवले.

तेवढ्यात रावणाने आपल्याकडील प्रहस्ताचा पुत्र जंबुमाळी यास मारुतीचा समाचार घेण्यास जिद्दीने पाठविला. सहा धटिंगण गाढवांच्या रथातून, जंबुमाळी वेगवान धनुष्यानिशी सज्ज होता. त्याने मारुतीवर अर्धचंद्र आणि नाराच हे बाण सोडले. बाणांच्या माराने मारुतीचे डोकेच भडकले. जवळ पडलेली एक मोठी शिळा मारुतीने उचलली व जंबुमाळ्यावर भिरकावली. जंबुमाळ्याने आपले बाण चालवून त्या शिळेचा चक्काचूर केला, पण शिळेतून उडालेल्या ठिकऱ्यांनी राक्षसच पुष्कळ मेले. अशा तऱ्हेने आपलाच डाव आपल्यावर उलटला. 'दुःखी दुःखच आपुल्याच चुकिचे, ग्रासोनि टाकी मन॥' याचा अनुभव जंबुमाळ्यास आला. त्याने संतप्त होऊन मारुतीवर सात बाण टाकले. त्यांचा प्रतिकार करण्यास मारुतीने चैत्यप्रासादाचा लोखंडी अडसर दोन्ही हातांनी गरगर फिरवून जंबुमाळ्यावर भिरकावून मारला. रथासह जंबुमाळ्याच्या

शरीराचा चुराडाच झाला. मारुतीने मग जंबुमाळ्याच्या शरीराला पायांखाली घालून धरणीमातेच्या पोटात रिचविले.

❀ ❀ ❀

## ११. वीराची ओळख

जंबुमाळी मारुतीने पायातळी घातल्याची वार्ता मिळाली तसा रावण बेभान झाला. त्याच्या सात मंत्र्यांच्या सात पुत्रांनी मारुतीला पकडून आणण्याची प्रतिज्ञा केली, पण तेच सर्व प्राणाला मुकले. मग रावणाने आपले निवडक सेनापती विरूपाक्ष, यूपाक्ष, दुर्धर, प्रहास आणि भासकर्ण यांना ससैन्य मारुतीवर सोडले.

चतुरंग सेनेसह दशदिशांनी या सेनापतींनी चाल केली. प्रमदवनाच्या दाराशी मारुती होता. त्या सर्वांचीच मारुतीने सरळ राळ उडविली राळ! रावणाला 'दे माय धरणी ठाय' झाले. तेव्हा त्याचा युवराज अक्षयकुमार त्याला अभय देण्यासाठी पुढे आला. आपला संततविजयी रथ घेऊन तो प्रमदवनासमोर गेला. त्याने रणगर्जना केली. मारुतीनेही तशीच रामरामी (सलामी) दिली. दोघांत युद्ध सुरू झाले. अक्षयकुमाराने फेकलेले व स्वतःच्या शरीरात घुसलेले बाण मारुती कुसळासारखे उपटून टाकी. अक्षयकुमाराने बाणांचा वर्षाव करताच मारुतीने दगडांची दरड कोसळल्यासारखाच अक्षयकुमारावर मारा केला. तुंबळ युद्ध झाले. अक्षयकुमाराच्या चढत्या वाढत्या रणकौशल्याचे कौतुकच मारुतीला वाटत होते. वीराला वीर ओळखतो. बऱ्याच वेळाने मारुतीने अक्षयकुमाराच्या रथाचे घोडे यमसदनाला पाठविले. रथ मोडून पडल्याचे दिसताच अक्षयकुमाराने उसळी मारून आकाशात उडी घेतली. मारुतीनेही तशीच उडी घेऊन अक्षयकुमाराचे पाय पकडले आणि अक्षयकुमाराने तलवारीचे पट्टे फिरवावयास सुरुवात करताच

अक्षयकुमारालाच मारुतीने गरगर फिरवून एका मोठ्या शिळेवर आपटले. अक्षयकुमाराच्या चिंधड्या झाल्या! मग तेथे राक्षससैन्य राहाते आहे कशास! सगळीकडे पळापळ व रडारड माजली. रावण दिङ्मूढ झाला.

❀ ❀ ❀

# १२. लंका पेटली

लंका सोडण्यापूर्वी मारुतीच्या मनात विचार आला की, राम लंकेवर चाल करून आले तरी लंकेचा किल्ला इतका बळकट की बोलायची सोय नाही. तेव्हा तो जरा खिळखिळा करून जावे.

मारुतीने लंकेतील अशोकवनातसुद्धा सर्व उद्याने उद्ध्वस्त करायला सुरुवात केली- फळे खाण्याच्या निमित्ताने! बागवानाची डाळ मारुतीपुढे शिजेच ना! मग आला मेघनाद. मारुतीशी केलेल्या धक्काबुक्कीत त्याचे प्राण आले कंठाशी! तेव्हा त्याने मारुतीवर



ब्रह्मपाश टाकला. मारुतीने ब्रह्मपाशात अडकून जाण्यात आनंद मानला.

लगेच मेघनादाने मारुतीला रावणाचा दरबारच दाखवला! दरबारात त्याच्या अंगावरचा ब्रह्मपाश गळूनच पडला. रावणाच्या दरबारात मोठमोठे देव, लोकपाल, दिशादिशांचे संरक्षक राजे हात जोडून उभे होते. गुरुवर्य सूर्याचा तेजोभंग झालेला, वायुदेवाला पंखा मारावा लागे, तर अग्निदेवाला आज्ञेची वाट पाहत बसावी लागे. अशा मेळाव्यात मारुती 'छाती पुढे, मान ताठ, हाताच्या मुठी वळवून मांडीवर धरलेल्या' अशा थाटात उभा राहिला होता. तेव्हा रावणाने त्याला सहजच विचारले, "कोण रे तू? एवढा उत्पात मांडला होतास तो कशाच्या जोरावर?"

"अखिल ब्रह्मांडाचा आधार जो ॐकार तोच माझा जोर" मारुती उत्तरला. "मला रामदूत हनुमान म्हणतात. मी माझ्या ध्येयपुरुषापुढेच फक्त हात जोडतो. इतरांपुढे तसे करण्याचे मला कारणच नाही. खर, दूषण, त्रिशिरांसह चौदा हजार सेनेचा फडशा पाडणाऱ्या वालीची वाट ज्याने लावली त्या रामाला काय तू ओळखत नाहीस? अरे, त्याच्या गैरहजेरीत तू त्याची बायको बैराग्याच्या वेशात पळवून आणलीस हे काय मला ठाऊक नाही?"

मारुतीच्या अशा निर्भीड बोलण्यानेच राक्षसांचा तो दरबार थरथरू लागला. तेव्हा मारुती म्हणाला, "फळे-पाने मी तोडून खाल्ली ती मला भूक लागली म्हणून. ज्या दुष्टांनी मला मारपीट केली त्यांच्यावर मी स्वसंरक्षणार्थ उलटलो यात काय चुकले? राजा रावणा, तुझ्या हिताची गोष्ट सांगतो ती ऐक. सीतामाईला स्वतः तू रामचरणी सादर कर. तो दयाळू तुला क्षमाच करील. तू रामाच्या भजनी लाग आणि निर्धास्तपणे लंकेचे राज्य भोग. तुझी संपत्ती, शक्ती, विद्वत्ता, कुलीनपणा अहंकारामुळे वाया जात आहे."

रावण या भाषणाने संतापलाच. त्याने, 'मारुतीला मारून टाका', अशी आज्ञा राक्षसांना दिली. आता बिभीषण रावणाच्या पुढे झाला, तो म्हणाला, "दूताला मारणे हे राजनीतीला आणि माणुसकीला सोडून आहे."

तेव्हा रावणाने मारुतीचे शेपूट जाळण्याचा हुकूम दिला. त्याप्रमाणे मारुतीच्या शेपटीला चिंध्या गुंडाळून त्यावर तेल ओतण्यात आले व आग लावण्यात आली. दहा-वीस राक्षसांनी मारुतीला धरून शहरात त्याची धिंड काढली. पोरे टाळ्या वाजवून हसू लागली!

मारुती काय कमी होता? त्याने शेपटाचा एक तडाखा दिला. सारे राक्षस जीव मुठीत घेऊन पळून गेले. मग मारुती मोकळा होऊन एका घरावरून दुसऱ्या घरावर उड्या घेताना प्रत्येक घर जाळू लागला. लंका धडाधड पेटली. सारी यंत्रणा जळून खाक झाली. मग मारुतीने समुद्रस्नान केले, फिरून सीतादर्शन घेतले, सीतेने दिलेला चूडामणी घेऊन रामभेटीसाठी मारुती परतला.

❀ ❀ ❀

## १३. अनन्य भक्त!

जांबुवंत, अंगद वगैरे मित्रांना सारी हकीगत सांगून मारुती त्यांच्यासह मधुवनातील फळांवर ताव मारीत बसला. मग सगळे प्रभू रामाजवळ आले. झाले ते व केलेसवरले ते सारे मारुतीने प्रभू रामांच्या कानावर घातले. लंकेचे ऐश्वर्य, रावणाची ताकद व दरारा, सारे सारे काही रामांना सांगून टाकले. तेव्हा राम म्हणाले,

"हनुमंता, तुझ्याइतका परोपकारी मी कोठे पाहिला नाही! मी तुझा कसा उतराई होऊ?"

मारुती रामचरणांवर पडून हुंदके देऊन त्यांच्या चरणांवर अभिषेक करू लागला– रामांनी त्याला उठवले, पोटाशी धरले

आणि अनन्य भक्त म्हणून तुझा आदर्श लोक आपल्यापुढे ठेवतील, असा आशीर्वाद दिला.

❀ ❀ ❀

## १४. शरणार्थींना अभय

लंकादहन झाले. मारुती परत आला. त्याने सीताशोधाची बातमी प्रभू रामाला दिली, रामांनी लंकेवर चाल करून जावयाचे, देवांना व सीतेला सोडवावयाचे आणि त्यासाठी जरूर तर लंका जिंकून रावणवधही करावयाचा असे ठरविले. सुग्रीव, हनुमान, अंगद, नल, नील जांबुवंत वगैरे महावीर व अफाट वानरसेना घेऊन राम लक्ष्मणासह दक्षिण दिग्विजयाला निघाले.

वाटेत कोणालाही कसलाही त्रास न देता, राम मजल दरमजल करीत दक्षिणसमुद्रावर दाखल झाले. वर तारकामय आकाश व खाली फेसाळलेला समुद्र परस्परांत चमक मारण्याच्या स्पर्धा खेळत होते. हा समुद्र तरून लंकेत जावयाच्या वाटाघाटी सुरू झाल्या.

एवढ्यात चार सशस्त्र अनुयायांसह बिभीषण रामाच्या छावणीच्या दाराशी आल्याची वर्दी आली. रावणाचा भाऊच तो! वानरसेनेत साहजिक खळबळ उडाली. सुग्रीवाने सर्वांना सावधगिरीचे इशारे केले. तो प्रकार पाहताच बिभीषण, सुग्रीवास म्हणाला, "माझा भाऊ रावण याने सीतेला लंकेत आणून ठेवली, ते बरोबर केले नाही असे मी त्याला परोपरीने सांगितले; पण उलट तोच मला नीती पायाखाली तुडवून द्रोही ठरवू लागला. शेवटी त्याने मला हाकलून लावले. म्हणून मी बायकामुलांना सोडले व शरणागतास अभय देणाऱ्या सत्यशील रामाच्या पायाजवळ आलो आहे."

सुग्रीव रामाकडे गेला. झाली हकीगत सांगितली. शत्रूच्या

गोटातील माणसाच्या साळसूद बोलण्यावर विश्वास ठेवण्यात अर्थ नाही, असाही अभिप्राय त्याने दिला. रामांनी आपल्या सर्व सहकाऱ्यांस सल्ला विचारला. 'रावणाचा हा एक डाव असेल!' अशी शंका एकाने उपस्थित केली. 'आपल्या गुप्तचराकडून शोध घेऊनच काय करावयाचे ते करावे,' असाही इशारा मिळाला. शेवटी राम मारुतीकडे वळले. तो 'बुद्धिमतां वरिष्ठ' म्हणाला, "प्रभो, आपणा सर्वांच्या अक्कलहुशारीपुढे आणि अनुभवापुढे माझा काय पाड? मला आपल्या सगळ्यांहून वेगळेच वाटत आहे. बिभीषण इतक्या जवळ आला आहे, की गुप्तचर पाठवून शोध घेत बसण्याला वाव आहे कोठे? मित्रभावाने आलेल्याशी आपण खोटेपणाने वागल्यास चाणाक्ष माणसाला संशय येतो. मैत्रीचा व इष्ट कार्याचा फडशा पडतो; बिभीषणाच्या सरळ हृदयाचा मला सीताशोधाच्या वेळी अनुभव आहे. त्यातून रावणाचे काही कपट असले, बिभीषणाचा काही स्वार्थ असला अगर काही दग्याचा मनसुबा असला, तर आपणच आपल्या सावधानतेने त्याचा काटा काढला पाहिजे, त्यासाठी पहिल्यापासूनच माणुसकीला ठोकरून उपयोग नाही! बिभीषणाच्या बोलण्यात दुष्ट भाव नाही, चेहरा प्रसन्न आहे. तो भलत्या जागी व भलत्या प्रसंगीही आपल्याकडे आलेला नाही. सीता शोधानंतर लंकेत खळबळ उडाली. आपण लंकेच्या सीमेवर तळ ठोकून पुढच्या तयारीला लागलो आहोत. रावणही दुष्टबुद्धी न सोडता आपल्यापरी तयारी करीत असेल. प्रभो, आपला पराक्रम व सत्यनिष्ठा बिभीषणाला कळली असेल, आपण वालीचा वध केला तरी त्याचे राज्य सुग्रीवालाच दिलेत हेही त्याच्या कानावर असणार? तेव्हा आपल्या लंकेवरील स्वारीची संधी साधून आलेल्या बिभीषणाला आपली मैत्री हवी असली तर नवल काय? रावणाचे व बिभीषणाचे पटत नाही, हे मला अनुभवाने ठाऊक आहे. शिवाय, हेर असतात ते उघडपणे सशस्त्र कधीच

यावयाचे नाहीत, म्हणून मला वाटते की शरणार्थीला प्रभूंनी आश्रय, आधार आणि आपुलकी द्यावी.''

रामांनी मारुतीच्या म्हणण्याला मान दिला. चालून हाती आलेले राज्य स्वतःच नको म्हणणारे 'भरत' विरळाच! वालीमागे त्याचे राज्य आपल्यासारख्या भावाला मिळावे, असे म्हणणारे सुग्रीवच सर्वत्र भेटणार, हे राम जाणत होते.

❀ ❀ ❀

## १५. राक्षस सेनेची दाणादाण!

वानरसेनेसह राम लंकेत उतरले. सैन्याचे मोर्चे बांधण्यात आले, पश्चिम वेशीसमोर मारुतीची योजना झाली. राम, लक्ष्मण, बिभीषण व त्याचे चार अनुयायी एवढे सात जणच मनुष्यरूपाने लढणार व बाकी सर्व शेपटीसारखा पाश जय्यत ठेवून वानरचिन्हांनी लढणार, अशी आखणी करण्यात आली. लंकादहन करणारा मारुती रणांगणावर ठाकलेला पाहून राक्षसांच्या तोंडचे पाणीच पळाले.

पुढे येणाऱ्या कोणत्याही वीरास लोळवणारा धूम्राक्ष रावणाने तडाख्यासरशी रामसेनेवर सोडला. त्याने हनुमंताच्या पश्चिम वेशीजवळील सैन्यावर तुटून पडण्याची पराकाष्ठा केली, पण बलभीमाच्या सैनिकांपुढे त्याचे सर्व हल्ले लटपटले. धूम्राक्ष चवताळला, त्याने बाणांचा भडिमार चालविला. राक्षस पुढे सरसावत आहेत हे मारुतीच्या लक्षात आले. त्याने प्रचंड वृक्ष आणि शिळा शत्रुसेनेवर कोसळविल्या. धूम्राक्षाचा रथ छिन्नभिन्न झाला. मग तो काटेरी गदा घेऊन मारुतीवर धावला. मारुतीने प्रचंड शिळा धूम्राक्षाच्या डोक्यात ठणकावली. धूम्राक्ष परलोकवासी झाला.

पण त्याची जागा भरून काढली अकंपनाने! तो आपल्या नावास साजेसे युद्ध करू लागला, लगेच हनुमंताने पुढे झेप घेतली. अकंपनाच्या अंगावर पर्वतशिखरे टणत्कार करू लागली. तीव्र बाणांनी अकंपन त्यांचे तुकडे करीत सुटला, हे पाहाताच मारुतीने एका प्रचंड वृक्षाला गोफणीसारखे गरगर फिरवले व अकंपनाच्या डोक्यावर तो मारला.

अकंपनाचा चक्काचूर झाला. मग राक्षससेनेची दाणादाण काय विचारावी? पळता भुई थोडी झाली.

❀ ❀ ❀

## १६. प्रलयाची आग

कुंभकर्ण हा रावणाचा भाऊ. तो लढाईत कामास आला. लगेच त्याचा मुलगा कुंभ रणांगणावर उतरला. सुग्रीवाने त्याला बापाच्या वाटेला लावले! लढाईच्या धुमश्चक्रीतही कुंभाच्या जागी त्याचा भाऊ निकुंभ ठाण मांडून उभा राहिला.

त्याच्यापुढे वानर वीर टिकेनात. निकुंभ म्हणजे प्रलयाची आग! तिला पुरून कोण उरणार? रणधुमाळीत ही हुडकाहुडकी करायची तरी कशी? ज्याचा तोच तेथे निर्णय घेणार. तेव्हा मारुती धट्टपणे पुढे झाला.

निकुंभाला लगावला त्याने एक ठोसा. निकुंभाचे कातडे फाटले; रक्त वाहू लागले. म्हणून निकुंभ काय डरणार? अवाढव्य राक्षस तो. त्याने हिसकले मारुतीला. पण मारुती निसटला. 'चपलांग पाहता मोठे, महाविद्युल्लते परी।' असा मारुती होता. निकुंभाला त्याने आपली वज्रमूठ मारली. झाले! निकुंभ खाली पडला. तो पडला रे पडला की मारुती त्याच्या छातीवर चढला, निकुंभाची मानच आता मारुतीने पिरगाळली. तो "मेलो, मेलो, मेलो!"



असा आरडाओरडा करीत असताच, मारुतीने त्याचे डोके धडावेगळे केले अन् दिले भिरकावून राक्षसांच्या सेनेत!

❀ ❀ ❀

## १७. नागलोकांत

रामरावण युद्ध जुंपले होते. रात्रीची वेळ होती. हनुमान पहारा देत होता. इतक्यात बिभीषण आला असे वाटले, म्हणून मारुतीने त्याला जवळ बोलावले. विचारले, "भाऊराया, इतक्या रात्री कोठून आलास?"

"मी संध्येला गेलो असता, मला प्रभूंचा निरोप आला होता म्हणून उशीर झाला तरी मी आलो आहे."

सारे स्वस्थ झोपी गेले. 'रामलक्ष्मणांना खांद्यावर टाकून सूंबाल्या

केला कोणीतरी,' असे आढळून आले. दुसरे दिवशी सकाळी सगळीकडे गडबड उडाली. सुग्रीव, जांबुवंत, बिभीषण सारे अवाक् झाले. काय झाले ते मारुतीने सांगितले. तेव्हा बिभीषण म्हणाला, "अहिरावणाचेच हे काम. मारुतीला हुकवण्याइतका बेमालूम बिभीषण दुसरा कोणीच बनू शकणार नाही!" हनुमान त्यावर म्हणाला, "तो कोणीही असो; गफलत माझी झाली आहे तर काय वाटेल ते करून प्रभूंना सोडवून मीच आणले पाहिजे."

हनुमान निघाला. वाटेत त्याला समजून चुकले, की अहिरावण रामलक्ष्मणांना घेऊन नागलोकांत गेला आहे. तेथे राजवाड्यातच घुसण्याचा मारुती जोर करू लागला. पण मकरध्वज आडवा आला.

"कोण रे तू धसमुसळ्या? काही अक्कल आहे तुला? पोरासारखा राजवाड्यात शिरू पाहातोस, पण लोखंडाचे चणे खावे लागतील! महावीर हनुमानाच्या मुलाशी प्रसंग आहे, लक्षात ठेव."

शेवटचे वाक्य ऐकून मारुती चमकलाच. तो म्हणाला, "म्हणतोस काय तू? मीच हनुमान. ब्रह्मचारी आहे मी. तू माझा मुलगा म्हणून कोठून कसा उपटलास बाबा?"

तेव्हा तो पहारेकरी म्हणाला, "आपण जेव्हा लंका जाळून समुद्रस्नान केलेत, तेव्हा आपला मळ एका मगरीने गिळला होता. त्यापासून मी तिच्या पोटी जन्मलो. मकरध्वज म्हणतात मला. धन्य धन्य मी, आज आपली भेट झाली!"

मारुतीने मग मकरध्वजाला विश्वासात घेतले. रामलक्ष्मणांचा पत्ता विचारला. मकरध्वज म्हणाला, "मला काही माहीत नाही, पण आज कोणाला तरी बळी देणार आहेत. तेथे कोणासही जाण्यास मनाई आहे. मी आपणासही जाऊ देणार नाही."

दोघांचीही स्वामीनिष्ठा मग पणास लागली. दोघांत लढत

झाली. एकापेक्षा एक वरचढ होते ते बापलेक! शेवटी हनुमानाने मकरध्वजाला त्याच्याच शेपटीने बांधून जखडून ठेवले व घुसला मंदिरात.

मंदिरातील देवीचा मुखवटा घालून मारुतीच तिच्या जागी उभा राहिला. राक्षसांना वाटले, की आज देवी प्रसन्नच प्रसन्न होऊन चैतन्यशाली झाली आहे. कारण तिला काही अर्पण केले की देवीच त्याचा स्वाद घेताना आढळली. बलिदानाची वेळ आली. रामलक्ष्मणांना आणण्यात आले. राक्षसांनी रामलक्ष्मणांची चांगलीच टिंगल चालविली होती. रामलक्ष्मण हूं की चूं करीत नव्हते. अहिरावणाने त्यांना सांगितले की, "घ्या आता आपल्या रक्षकदेवतेचे नाव!"

राम हसून म्हणाले "आपलीच देवी आपला बळी न घेवो म्हणजे झाले!"

तोच अहिरावण रामलक्ष्मणांवर आपली तलवार चालविण्यास धावला. लगेच मारुतीही पुढे सरसावला, रामलक्ष्मणांना खांद्यावर बसवले व अहिरावणाच्या हातचीच तलवार काढून घेऊन तलवारीचे हातपट्टे फिरवू लागला. दंगल उडवून त्याने सुखरूपपणे रामलक्ष्मणांना घेऊन आपले शिबिर गाठले.

❀ ❀ ❀

## १८. रावणाच्या सेनेचा समाचार

दोन दिवस तुंबळ युद्ध झाले. नखशिखांत वीर रक्ताने न्हाले, कित्येक यमसदनी गेले. दोन्ही बाजूंचे वीर होते त्यात! लढाई म्हटले म्हणजे असेच चालते. राक्षस-सैन्याच्या मार्गात झाडे व डोंगर पाडून अनेक विघ्ने मारुती घालीत होता. त्यांच्या कौशल्याचीही फटफजिती होईल असे गनिमी कावेही करीत होता. दुसरे दिवशी

संध्याकाळी इंद्रजिताने नागबंधाचा प्रयोग करून रामलक्ष्मणांना युद्धकैदीच केले.

लगेच हनुमान गरुडाकडे धावला. गरुडाने तो नागबंध ताबडतोब तोडला! मग वानरांनी "मारू किंवा मरू" अशा निकराने लढावयाचे ठरविले. रावणाला हे कळताच, त्याने राक्षसांवर राक्षस सामना द्यावयास पाठविले. त्यांचा खरपूस समाचार जांबुवंतादी मंडळींनी घेतला. शेवटी वज्रदंष्ट्रासारखा कर्दनकाळ पुढे आला. जिवावर उदार होऊन अंगदाने त्यालाही यमसदनास पाठवले. रावणाची स्वारी हात चोळीत फेऱ्या घालू लागली.

❀ ❀ ❀

## १९. मारुतीचा जयजयकार

या रावणाच्या सेनापतींना मारुतीने व अंगदाने गारद केले. मग रावणाने अकंपन याची सेनापती म्हणून योजना केली. हा राक्षस कसल्याही परिस्थितीत डरत नसे. मोठी सेना घेऊन अकंपन रणांगणावर घुमत आला, तेव्हा रामाकडील सर्व वानरगणच थरथर कापू लागला!

सगळीकडे खळबळ उडाली व धुमश्चक्री माजली. अकंपनाने वानरगणाशेजारीच रथ नेऊन प्रत्यक्ष यम अवतरल्यासारखा पराक्रम केला. वानरगण काढता पाय घेईल अशी भीती वाटताच, मारुती गर्जना करून अकंपनाशी सरळ भिडलाच! भिडताभिडताच मारुतीने एक पर्वतखंड अकंपनाच्या टाळक्यात घातला, पण अकंपनाने आपल्या खड्गाने त्या पर्वतखंडाचेच तुकडे तुकडे करून टाकले. मग मारुतीने वृक्ष-मारा असा झपाट्याने केला की अकंपनाचे सैन्यच्या सैन्य बेचिराख झाले.

मग पिसाळला, चवताळला, तुटून पडला अकंपन! मग

त्याने मारुतीवर चौदा प्रखर बाणांचा वर्षाव केला. उलट मारुतीने वृक्षबाणांचा असा आघात अकंपनावर केला की, तो राक्षस जमिनीवर आपटताच मोठा धरणीकंप मात्र झाला. त्यासरसे राक्षसैन्य पळ काढून लंकेत घुसले.

इकडे वीर मारुतीला रामाच्या सैनिक सेनापतींना खांद्यावरून जयजयकार करीत मिरवीत नेले. तिकडे रावणाने प्रहस्ताला रामसैन्यावर घातले, पण नील वानराने त्याचा बळी घेतला, तसा स्वतः रावणच रणांगणी उतरला.

❀ ❀ ❀

# २०. राम-रावण युद्ध

सेनापती अकंपनाचा शेवट झाल्यावर, स्वतःच रामांची परवानगी घेऊन लक्ष्मण रावणाशीच सामना करावयास इर्षेने गेला. त्याच वेळी वज्रांग मारुतीही तेथे येऊन पोहोचला. त्याने रावणाला सुनावले की, "आपण कोणाला डरत नसाल! पण आता आम्हा वानरांशी गाठ आहे म्हटले!"

रावण काय गप्प बसणार? त्याने लगावली एक थप्पड हनुमंताला! 'दिधले दुःख पराने उसने ठेवू नयेचि फेडावे।' या तत्त्वाचा मारुती. त्याने आपले तत्त्व अमलात आणले आणि रावणाला गाल चोळावयास लावले. अशी लठ्ठालठ्ठी वानरगणांशीही झाली. तेवढ्यात नीलाच्या आडून रावणाने लक्ष्मणावर एक शक्ती सोडली. तिने लक्ष्मण घायाळ होऊन धरणीवर पडला. त्याला उचलून घेऊन आपला युद्धकैदी म्हणून लांबवण्याच्या नादात रावण होता. पण लक्ष्मण रतिभर हलला नाही! इतक्यात मारुतीनेच रावणाच्या छातीवर जबरदस्त मुष्टिप्रहार केला की, रावणाच्या तोंडून रक्ताची गुळणीच आली! मग तेथे राहतो कशाला रावण?

मारुतीने लक्ष्मणास रामाजवळ नेऊन ठेवले. लक्ष्मण सावध झाला. मग रामांनी स्वतःच रावणाशी युद्ध करण्याचे ठरविले. तेव्हा मारुतीने रामांना आपल्या खांद्यावर बसवूनच रणांगणावर नेले. पुढे अद्भुत रणकौशल्याचे राम-रावणाचे असे युद्ध झाले की, त्याला कशाचीच उपमा शोभणार नाही.

❀ ❀ ❀

## २१. शेवटचा हात

नरांतक व देवांतक या दोन बंधूंपैकी अंगदाच्या हातून नरांतक मारला गेला होताच. राहिलेला देवांतक मग त्रिशिरा आणि अतिकाय यांच्यासह हिरिरीने दाखल झाला रणांगणावर! लक्ष्मणाने अतिकायाला लोळवला, तर देवांतक आणि त्रिशिरा यांना मारुतीने मातीला मिळविले. पैकी देवांतकाला मारुतीच्या मुठीने बुकलले ते पुरेसे होते. त्रिशिरावर मात्र शिलाखंडांची आणि झाडांची झोडपणी मारुतीला करावी लागली. तरी आपल्या घोड्यावरून उतरलेला त्रिशिरा आपल्या सर्व सामर्थ्यानिशी मारुतीवर तुटून पडलाच! हनुमंताने मग अशी टांग दिली की, तिने त्रिशिरा जमीनदोस्तच झाला! लगेच मारुतीने त्याच्या हातची तलवार काढून घेण्याची चपळाई केली. तरी भडकलेल्या दिव्याच्या ज्योतीप्रमाणे देवांतक भपकन् उसळला. तेव्हा त्याच्याच तलवारीने त्याची तिन्ही डोकी मारुतीने धडावेगळी केली. मग मात्र सगळ्या राक्षसांना पळता भुई थोडी झाली व त्यांनी लंकेत जाऊन तोंड लपविले.

मग रावणाने इंद्रिजिताला पुन्हा रणांगणाचे आधिपत्य देऊन पाठविले. त्याने प्रत्यक्ष रामलक्ष्मणांशीच सामना आरंभला. त्यात जांबुवंतासह रामलक्ष्मणसुद्धा घायाळ झाले. जांबुवंत म्हणाला,

"बिभीषणा, मारुती जिवंत आहे ना? तो जिवंत असेल तर रावणाचा शेवट तो खास करील."

❀ ❀ ❀

## २२. लक्ष्मण पडला धरणीला

लक्ष्मण आणि मारुती यांनी इंद्रजिताशी घनघोर युद्ध आरंभिले. रावणाचा महापराक्रमी वीरपुत्र तो! रावणप्रेरणेने तो चवताळलाच होता! त्याने लक्ष्मण मेघनादाशी लढत असता लक्ष्मणावर चाल करून मयासुरांची शक्ती वापरली. मयासुर हा रावणाचा सासरा. त्याची ती अचूक शक्ती! आणीबाणीसाठीच ती होती, ती लागताच लक्ष्मण पडला धरणीला!

रामाला हादराच बसला. जिवाभावाचा आपला भाऊ गमावला, असे रामांना वाटले. राम शोक करू लागले. एवढ्यात सुषेण हे सुग्रीवाचे सासरे वैद्यराज धावत आले. ते म्हणाले, "रामा, आपण असा शोक करून कसे चालेल? लढाई आहे ही. लक्ष्मण केवळ बेशुद्ध झाला आहे."

"याला उपाय आहे?" रामांनी विचारले. सुषेण म्हणाले, "हो, नसायला काय झाले? संजीवनीवल्लीने मूर्च्छा जाते. विशल्पळरणीच्या रसाने शरीरात गेलेली बाणांची टोके बाहेर काढता येतात. सुवर्णकरणी आणि संस्थानी यांच्या रसाने जखमा ताबडतोब भरून येतात. या चारी वनस्पती द्रोणागिरीवरच आहेत. सूर्योदयापूर्वी त्यांच्या रस काढला तर तो गुणच गुण देतो."

कोण आणणार त्या वनस्पती? सारेजण एकमेकांच्याकडे पाहू लागले. रामांनी मारुतीकडे पाहिले. वाऱ्याच्यापुढे पळणारा बुद्धिमान मारुती म्हणाला, "रात्री त्या वनस्पतींना नेमके कसे मी ओळखणार? मी काही वैद्य नाही. तेव्हा द्रोणागिरीच आणून हजर करतो. घ्या



मग वनस्पती पारखून आणि वाचवा लक्ष्मणाला.''

कालनेमी दैत्याने विघ्नांवर विघ्ने आणली तरी मारुतीने द्रोणागिरीचा औषधी वनस्पतींचा भाग झटक्यात सादर केला. सुषेणाने सूर्योदयाच्या आत रस काढून लक्ष्मणास शुद्धीवर आणले. रामांच्यासह सर्व रणवीरांनी मारुतीची पाठ थोपटली व धन्यवाद दिले.

## २३. रावणाचा वध!

इंद्रजिताचे व लक्ष्मणाचे घनघोर युद्ध झाले. मारुती लक्ष्मणाचा पाठपुरावा करीत होताच. परंतु इंद्रजिताचा पराभव झाला.

आता रावण उफाळूनच रणांगणावर आला. बेताल, बेभान, बेफाम झाला होता तो. 'मारू किंवा मरू!' ही त्याची जिद्द होती.

जशास तसे या न्यायाने रामही रावणाशी त्याच जिद्दीने लढण्यास सरसावले.

रावण रथातून लढत होता. राम जमिनीवर उभ्या उभ्या लढत होते. तरीही ती निकराची लढाई होती. आभाळ आभाळाच्या आकाराचे, सागराची खळखळ सागरालाच करता येणारी, तसेच राम-रावणांचे युद्ध राम-रावणांनीच करावे! तरीही मारुतीला चुटपूट लागली!

'रावणाच्या मानाने रामाची हालचाल धोक्याची ठरणार! असहाय्य होतील एखाद्या हालचालीत राम! संकट कळल्यावर त्याचा बीमोड बुद्धिमंतांनी व शक्तिमंतांनी नाही करावयाचा, तर कुणी करावयाचा?' असा विचार करून मारुती चटकन् पुढे झाला. त्याने रामाला अलगद उचलून खांद्यावर घेतले. मग राम-रावणांचा खराखुरा सामना सुरू झाला. रावणाच्या रथाचा सारथी जसा मोहरा करी, त्याच्या तोडीचा मोहरा मारुतीचे शरीर करू लागले. मारुतीचे चपखल पवित्रे चतुराईने होऊ लागले.

रामाच्या जिवाला जीव देण्याचे ते मारुतीचे वेड पाहून, देवांचा राजा इंद्र शरमला! रावणाच्या बंदिशाळेतून देव सोडविण्यासाठी राम रावणावर चालून आला! त्या वनवासी रामाला देवांनी रथ पुरवला नाही आणि मारुती आपल्या शरीराचा रथ करून रामसेवा करतो आहे हे पाहून इंद्र अस्वस्थ झाला. त्याने आपला अमोघ रथ आणि कुशल सारथी मातली रामसेवेस सादर केला.

❀ ❀ ❀

# २४. लंकेवर विजय

वानरांनी पुन्हा लंकेवर हल्ला चढविला. हमरीतुमरीने युद्ध झाले. संध्याकाळ होताच मारुतीला पुढे करून वानरांनी मशाली घेऊन लंकाच पेटवली. दुसऱ्या दिवशीच्या युद्धात गोणिताक्षासारखा

पट्टीचा रणमर्द वानरांनी रणांगणावर लोळवला! मारुतीने निकुंथज, रामाने मकराक्ष असे राक्षसप्रमुख नाहीसे केल्यावर इंद्रजित पुन्हा सैनापत्य करावयास आला.

वानरांनी इंद्रजितावर निकराने हल्ला केला. शत्रूचा आपल्यावरील हल्ला शिलाखंडांनी आणि झाडांनी वानरगण निवारण करीत होते. मारुतीच्या सैन्याचा तो रुद्रावतार पाहून इंद्रजित निकुंभदेवीच्या मंदिरात पळाला. तेथे तो विजयप्राप्तीसाठी यज्ञ करण्याचा विधी करीत होता.

इतक्यात आपल्या खांद्यावर लक्ष्मणाला घेऊन मारुती मंदिरासमोर दत्त म्हणून उभा राहिला.

लक्ष्मणाने इंद्रजितावर बाणांचा नुसता वर्षाव केला. मारुतीने अनेक राक्षस नामशेष केले. इंद्रजितही मंदिराबाहेर येऊन सरळ सामना देऊ लागला. मारुती इंद्रजिताचे बाण शिळा फेकून तोडी. त्यामुळे लक्ष्मणाच्या बाणांना अप्रतिहत वाव सापडू लागला. अखेर लक्ष्मणाने इंद्रजिताचे मस्तक उडविले ते त्याची पतिव्रता पत्नी सुलोचना हिच्या अंगणात जाऊन पडले!

मारुतीने विजयाची वीरगर्जना केली. रावणाची संतापाने लाही झाली. आपल्या दिव्य रथात बसून रावणच युद्धास आला. त्याने युद्धाचे मूळ राम, त्यावरच दात-ओठ खाऊन हल्ला केला. राम-रावणांचे युद्ध रोखठोक व अतुलनीय झाले. रामाने अखेर एक दिव्य बाण रावणावर सोडला. बिळात साप घुसावा तसा तो रावणाच्या हृदयात घुसला आणि रावणाचे धूड पडल्याने येथून तेथून धरणी हादरली.

❀ ❀ ❀

# २५. सीतामाईचा आशीर्वाद

युद्ध संपले. लंका ताब्यात आली. तिची व्यवस्था तर लावली पाहिजे असा प्रश्न रामाच्या सल्लागार मंडळीत निघाला. रामांनी सांगितले "यात प्रश्न आहेच कोठे! आपण काही कोणाच्या राज्याचा अपहार करायला आलो नाही. रावणासारख्या दुष्टांचा संहार झाला आहे. त्याचा वारस बिभीषणासारखा सज्जन आहे. त्यालाच लंकेचे राज्य द्यावयाचे! पण त्या अगोदर, सीतेला सन्मानाने आणली पाहिजे. तेव्हा हनुमाना, बिभीषणाची आज्ञा घेऊन ती व्यवस्था कर."

मारुतीने आज्ञा पाळली. तो अशोकवनात सीतेपुढे जाऊन उभा राहिला. हात जोडून त्याने राम-रावणांच्या युद्धाची व रामविजयाची तिला बातमी दिली आणि सांगितले की, "आताचा लंकाधीश्वर बिभीषण मातोश्रींच्या दर्शनास लवाजमा घेऊन येणार आहे."

सीतेला आनंद झाला. आपले आनंदाश्रू पुसून ती मारुतीला म्हणाली, "आंजनेया, तुला या आनंदाच्या वार्तेबद्दल काय बक्षीस देऊ! या आनंदात तुझा हातभार लागला आहे. तुला बक्षीस देण्यासारखे जगाच्या जामदारखान्यात तरी काय आहे?"

"आपले वत्सल अन् मंगल आशीर्वाद आई!"

मारुतीने सीतेला वंदन केले, मग रामाकडे येऊन मारुतीने सीतेचे कुशल सांगितले व राम-मीलनाची तिची उत्कंठाही सांगितली.

बिभीषण सीतादर्शन करून आला. त्याला राज्यभिषेकही झाला. मग रामांनी अयोध्येकडे परतण्याची तयारी चालविली.

## २६. वीरांनी सूड उगवायचा नसतो.

बिभीषणाला लंकेचा राज्याभिषेक झाला. रामांचा निरोप आला. मंगलस्नान करून सीतामाई सौभाग्यलेण्यांनी सालंकृत झाल्या. बिभीषणाच्या राणीने सीतामाईंना फलाहार दिला; ओटी भरली; सीतामाई मग पालखीकडे निघाल्या. तोच मारुती दत्त म्हणून हजर! नमस्कार करून तो म्हणाला, "आई, सांगा, कोणत्या राक्षसीने तुम्हांला कसे छळले चौदा वर्षांत?"

सीतामाई म्हणाल्या, "कशाला हवे तुला ते? त्यांना शिक्षा नाही हो करायची! मी त्यांना अभय दिले आहे. त्यांनी मला छळले, ते रावणाच्या त्या नोकर म्हणून! काय चुकले त्यांचे त्यात? आता त्या बिभीषणाच्या नोकर आहेत. म्हणजे आपल्याच आहेत. विजयी वीरांनी सूड उगवायचा नसतो. माणुसकी दाखवायची असते."

"आई, हा धडा मला एकदम मान्य आहे." मारुतीने वंदन करून सांगितले.

❀ ❀ ❀

## २७. अंजनीची कणखर महत्त्वाकांक्षा

लंकेहून सुटलेले पुष्पक-विमान अयोध्येकडे झेप घेऊ लागले. वाटेत मारुतीने रामास सुचविले की, "हा खाली दिसतो आहे ना पर्वत, तेथे माझी माता अंजनी राहते."

आपल्या जीवनकार्यात कमालीचे साहाय्य करणारा कर्तबगार मारुती. त्याच्या आईचे दर्शन घेतलेच पाहिजे, असे रामांना वाटले. राम त्या पर्वतावर उतरले. मारुतीने सर्व मंडळींची अंजनीमातेला ओळख करून दिली व आईला साष्टांग नमस्कार घातला. रामांनी देखील अंजनीला वंदन केले. इतरांचे नमस्कार

झाले, रामांना रहावेना. राम अंजनीमातेला म्हणाले,

"माते तुझ्या उदरी जाण। हनुमंत जन्मला रत्न।
एवढे माझे रामायण। याचेनि योगे।।"

"आई, तू धन्य आहेस. मारुतीसारखा सेवायोगी वीर तुझा मुलगा आहे. रामाचा इतिहास मारुतीशिवाय लिहिलाच जायचा नाही!"

"पण देवा, असे म्हणायला याने केले तरी काय एवढे?" अंजनीने चौकशी केली. त्यावर रामांनी सीताशोध, लंकादहन, अहिरावणमहिरावण– निःपात, लक्ष्मणाला प्राणदान, अशा मारुतीच्या कर्तबगारीच्या सगळ्या गोष्टी सांगितल्या! त्यावर अंजनीमाता म्हणाली, "रामा, मुख्य मुद्द्याची गोष्ट बोला ना! रावणाला मारले कुणी?" राम म्हणाले, "ते माझ्या बाणाकडून घडले खरे!"

त्यावर अंजनीमाता म्हणाली, "ते कष्ट जर आपल्यासारख्या देवाला पडले तर मला हा मुलगा झालाच कशाला अन् आपला भक्त म्हणवितो तरी कशाला?"

अंजनीमातेच्या या बोलण्याने सारेच तिच्याकडे पाहू लागले. तेव्हा अंजनीने आपल्या दुधाची धार सोडून दाखवली. ती तीरासारखी गेली व तिने समोरच्या खडकाचा भेद केला. तो दाखवून अंजनी म्हणाली,

"माझ्या दुग्धाची हे प्रौढी। कळिकाळांची नरडी मुरडी
रावणादिक ही घुंगुरडी। बापुडी येथे"

"देवा, असे हे शक्तिशाली दूध हा प्यायला आहे. मग त्याने रावणाला मारण्याचे कष्ट आपल्याला का द्यावेत?"

रामांना अंजनीच्या कणखर महत्त्वाकांक्षेबद्दल नितान्त आदर वाटला. ते म्हणाले, "आई, तुझ्यासारख्या वीरमाताच आपल्या राष्ट्राच्या जीविताची संजीवनी विद्या होत."

❀ ❀ ❀

# २८. अयोध्येकडे परत!

राम पुष्पक विमानातून अयोध्येला चालले होते. भरद्वाज ऋषींचा आश्रम नजरेस पडला. रामांना आठवण झाली. 'अयोध्येला परत जाताना एक दिवस माझ्या आश्रमात विश्रांतीसाठी थांब,' असे भरद्वाजांनी रामांना सांगितले होते. राम थांबले. तेथे त्यांनी मारुतीला हाक मारली; सांगितले, "नंदीग्रामला जा. राम परत येत आहेत आता एवढ्यातच, असे भरताला सांग. ते सांगताना भरताच्या चेहऱ्यावरचे भाव टिपून पाहा. त्याची नाराजी दिसली तर ताबडतोब कळव!"

'चौदा वर्षे राज्यलक्ष्मीचा कारभार करणारा भरत! त्याला तिचा लोभ जडला असला तर करायचे काय अयोध्येला जाऊन?' असे रामांना वाटत होते. भरताकडे राज्य राहिल्याने कैकेयी मातेची इच्छा तृप्त होईल!

पण असे कोठले व्हायला? चतुर मारुतीला असे आढळले की, 'राम वचनाप्रमाणे भेटतोय कधी?' असे भरताला होऊन गेले होते! जटांचा मुगुट बांधून भरत कुशासनावरच बसत-उठत असे; त्याचे शरीर सुकून गेले होते; डोळ्यांत आसू आणून तो रामांच्या स्मृतीला अभिषेक करीत असे; रामांच्या पादुका सिंहासनावर ठेवून त्यांच्यातर्फे अयोध्येचा राज्यकारभार हाकणारा हा नंदीग्रामचा विरागी स्वतःचा संसारही विसरला होता. चौदा वर्षांचा वनवास संपवून राम येताहेत असे कळताच भरत मारुतीला म्हणाला, "धन्य! धन्य! राम एकवचनी आहे. मीही त्याचाच भाऊ आहे. राम न येता, तर मी अग्निकाष्ठे भक्षणच करणार होतो!"

❀ ❀ ❀



# २९. हृदयात रामदर्शन

प्रभू रामचंद्रांचा राज्याभिषेक झाला. सर्वजणांना पारितोषिके देण्यात आली. ती स्वतः रामांनी आपल्या हातानेच दिली. सुग्रीव, बिभीषण प्रभृतींना बहुमोल रत्ने, वस्त्रे, अलंकार दिले गेले, पण का कोण जाणे मारुतीला आपल्या हाताने उचलून काही दिले नाही.

मारुतीला राम अगदीच कसे विसरले? सर्वजण नवल करीत होते! सीतामाईंनी मग आपल्या गळ्यातील अमोल असा रत्नांचा हार काढला आणि मारुतीला घालावयास दिला. सगळेजण सीतामाईंच्या गुणग्राहकतेची तारीफ करू लागले. कित्येकांस कृतज्ञतेचे भरते आले.

पण हे सारेच क्षणचित्र ठरले. दुसऱ्या क्षणी सारेजण मारुतीकडे टकमका पाहू लागले. त्यांना वाटले, मारुतीला वेड लागले की

काय? कारण मारुती एकएक रत्न काढीत होता, निरखीत होता अन् फोडून टाकीत होता. हे चालले आहे काय, हेच कोणास कळेना! किती रत्नांचा सत्यानाश मारुतीने केला, असाच अचंबा प्रत्येकास वाटत होता.

अखेर मंडळींना राहवेना. राम शांत होते; सीतामाई गालांतल्या गालांत हसत होत्या; लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न वेड्यासारखे पाहत होते. तेव्हा एका माणसाने धाडस करून विचारले, "मारुतीराया, काय चालविलंय तुम्ही हे? रत्नांची अशी माती करायची? तुम्हाला काही कळते की नाही?"

मारुती उत्तरला, "नाही त्या उठाठेवी तुम्हाला का? सीतामाईंनी मला रत्नहार दिला. त्याचे मी काय वाटेल ते करीन. मी चालविली आहे रत्नांची पारख. त्या पारितोषिकाच्या पारखीवरून ते मिळवणाराचीही पारख होते. म्हणून हे माझे आत्मनिरीक्षण आहे. या रत्नांचे पाणी चमकदार आहे. याचे बाजारमोल एवढे होईल की कोणी खरेदीच करू शकणार नाही! ही रत्ने अंगावर घातली तर शोभा अपूर्व ठरेल. पण या सर्वांत काही राम आहे का? ज्या वस्तूत, घटनेत, व्यवहारात राम नाही त्याचे मला काही मोल वाटत नाही. मी मघाचपासून पाहातो आहे, तो एकाही रत्नात राम नाही. माझी कसोटी अशी आहे. एरवी, ही रत्ने केव्हातरी वायाच जायची ना? मग मी आज तरी त्यांचा लोभ कशाला धरू?"

त्यावर एकाने विचारले, "तुझ्याच कसाने पाहावयाचे झाले, तर तुझ्यात तरी राम आहे का?"

मारुती ताडकन् उत्तरला, "माझ्यात राम नसेल तर मी मारुतीच नाही!" असे म्हणून त्याने दोन्ही हातांच्या नखांनी छाती फाडून आपले हृदय सर्वांना दाखवले. तेव्हा सर्वांना त्याच्या हृदयांत रामदर्शन झाले. मग सगळ्यांची तोंडे गप्पच झाली!

❀ ❀ ❀

# ३०. अश्वमेधाचा घोडा पुढे गेला

भगवान रामचंद्रांच्या अश्वमेधाचा घोडा सोडला गेला. शत्रुघ्न, पुष्कल, लक्ष्मीनिधी यांच्यासारखे वीरवर त्या घोड्याच्या रक्षणासाठी होते. मारुती अर्थातच त्यामध्ये होताच.

घोडा चक्रांका नगरीत आला. तेथील राजा सुबाहू याने तो अडविलाच. धुमश्चक्रीत अनेक वीर कामास आले व चक्रांकाचा मुलगा चित्रांग, भरताचा मुलगा पुष्कल याच्याशी लढताना पडला. शेवटी सुबाहू व मारुती यांचा सामना जुंपला. मारुतीची एक टांग सुबाहूच्या छातीवर लागली, सुबाहूला मूर्च्छा आली!

सावध होऊ लागताच आपण ऐकलेली रामाची कीर्ती सुबाहूला आठवली! मारुतीसारख्या कर्तृत्ववंतांचा धनी राम, हे उमगल्यावर ऐकलेली स्तुतिमय कीर्ती खरीच असल्याचा अनुभव सुबाहू चोखाळू लागला.

आपल्याच अज्ञानाची व भ्रमाची कीव करून, तो मारुतीची आराधना करू लागला. दोघांचा समझौता झाला. मग आहेर वगैरे घेऊन सुबाहू मारुतीसह अयोध्येला गेला. तेथे त्याने अश्वमेधाच्या कार्यक्रमात रामसेवा आरंभली.

इकडे अश्वमेधाचा घोडा देवपुरात आला. तेथील राजा वीरमणी शिवभक्त होता. त्याने घोडा अडविला. शत्रुघ्नाशी लढत अशी दिली की प्रत्यक्ष भगवान शंकर लढत असल्याचा भास शत्रुघ्नास झाला! निकराच्या युद्धात शत्रुघ्न-पुष्कल हे जवळ जवळ संपलेच असे रणनिरीक्षकांना वाटले! शेवटी मारुतीला धावून येणे भाग पडले.

सरळ सामना सुरू होण्यापूर्वी मारुती वीरमणीला म्हणाला, "वारे वा शिवभक्त! स्वतः शंकर रामाची भक्ती करतात आणि येथे शिवभक्त रामाच्याच अश्वमेधात विघ्न करतो आहे!"

तरीही युद्धाची झिम्मड उडालीच! कारण कोणी कोणाचा भक्त, चाहता अगर स्नेही आहे म्हणून उगीचच कोणाचे तरी सार्वभौमत्व मान्य करण्याने व्यावहारिक गुलामगिरीच येते. धक्काबुक्कीचा मामला कोठेही झाला तरी कठीणच! मारुतीचे टोले, ठोसे वीरमणीला निभावले नाहीत. त्याचा रथ मोडून पडला. त्याची आयुधे तोटकी पडली. त्याचे शरीरही घायाळ होऊन गेले. नंदी उधळावा तसा रणांगणातून पाय काढण्याचा प्रयत्न वीरमणी करू लागला! पण त्यापूर्वी वीरमणी मारुतीला म्हणाला, "खरा रणसिंह आहेस तू! तुझ्याशी लढत करायला मिळाली हे मी माझे भाग्य समजतो. मी काय करू तुझ्यासाठी?"

"रामकृपेने मला काही कमी नाही." मारुती अगदी विनम्र भावनेने बोलला. "तू म्हणतोसच तर माझ्याकरता एवढे कर की रणांगणात जे कामाला आलेत, त्यांच्या कुटुंबांना सांभाळ; जे जखमी झाले आहेत, त्यांची शुश्रूषा कर; मी तुला द्रोणागिरीहून औषधी पुरवतो."

मारुतीने ते केले. रणनीती जाणणारे धनवंतरीही एकापेक्षा एक असे उभे केले. तेव्हा सगळीकडूनच मारुतीचा जयजयकार होऊ लागला. औषधांचा प्रयोग करताना मारुती म्हणाला–

यद्यहं मनसा, वाचा, कर्मणा राघवंप्रती।
जानामि तर्हि एतेन भेषजेनाशु जीवतु।।

आणि चमत्कार झाला. जखमी झालेले सैन्य पटापट बरे होऊन उठू लागले. उठलेला प्रत्येक वीर वीरमणीशी युद्धाचीच भाषा करू लागला व पुढे सरसावू लागला. त्यातच शत्रुघ्न होता. त्याने परत वीरमणीशी मातबर युद्ध केले. पण वीरमणीच्या बाणांनी फिरून घायाळ होऊन तो 'राम राम' म्हणू लागला.

तोपर्यंत मारुतीने प्रभू रामचंद्रांनाच तेथे आणविण्याची व्यवस्था केली होती.

राम वीरमणीला म्हणाले, “खरंच आहेस तू शिवभक्त. प्रलयाचा देव तो. तसाच पराक्रम करून तू आपली शिवभक्ती आम्हाला व जगास पटविलीस. पण शंकर माझे दैवत आहेत. तेव्हा तूही माझाच आहेस. शंकराच्या व रामाच्या परिवारात बंधुभाव नांदावा. सरळच नाही का हे?”

मग सगळे एक झाले. दुःखितांच्या सांत्वनास वीरमणी लागला आणि रामांच्या अश्वमेधाचा घोडा पुढ चालू लागला.

❀ ❀ ❀

## ३१. आनंदी रामसेवक

रामांच्या अश्वमेधाचा घोडा वाल्मीकींच्या आश्रमापर्यंत आला. तेथे सीतेचे पुत्र लव आणि कुश होते. त्यांनी तो अडविला. घोड्याबरोबर लक्ष्मण होता. लवकुश युद्ध खेळले. लक्ष्मण हरला तेव्हा सुग्रीव व हनुमान त्या लवकुशांशी झुंजले. पण तेही हरले. लवकुशांनी त्यांना बांधूनच घातले.

तेव्हा आश्रमात असलेल्या सीतामाईंच्या ते लक्षात आले. त्यांनी आपल्या मुलांना घोड्याबरोबरच्या मंडळींची ओळख करून दिली आणि सगळ्यांना मोकळे केले. सीतामाईंनी व वाल्मिकींनी पुत्रांना वीरवर केलेले पाहून रामांचे सेवक साहाय्यक इतके आनंदले की, रामांना ते वृत्त आपण केव्हा सांगतो असे त्यांना होऊन गेले.

❀ ❀ ❀

## ३२. देवापेक्षा भक्त सवाई

राज्याभिषेकानंतर रामांनी आपल्या सर्व स्नेहीसहाय्यकांना मानाने निरोप दिला होता. पण मारुतीने विनंती केली होती की, “मला

आपल्या पायाजवळ राहण्याची परवानगी द्या." रामांनी ती दिली होती.

आपले आखलेले जीवनकार्य संपले असे रामांना आढळून येऊ लागले. तेव्हा त्यांनी मारुतीला बोलावून घेतले. सांगितले की, "मी आता इहलोकाचा निरोप घेऊ पाहातो आहे. उगाच हळहळू नको. तू चिरंजीव हो आणि पृथ्वीवर शांती, प्रेम व ज्ञान यांचा प्रसार कर. दुष्टांचे दमन आणि सज्जनांचे संरक्षण हे मी करीत आलो; तेच तुला करावयाचे आहे. तू आठवण काढलीस की मी तुझ्याजवळच आहे. जेथे जेथे रामकथा तेथे तेथे मारुतीची तत्परता. तसाच मीही तुझ्यासारखा भक्तांच्या हृदयात राहूनच 'चिंता वाहातो विश्वाची' एवढेच सांगतो."

मारुती म्हणाला, "भगवान्, मला तरी दुसरं काय हवं?"

तेव्हा रामांनी आशीर्वाद दिला, "मारुते, तू जी उत्कृष्ट कामगिरी बजावली आहेस, तीमधील एकेका कर्तबगारीबद्दल एकेक प्राण वेचला तरी तिचे मोल व्हावयाचे नाही. तुझ्या आयुष्यात लोकांकडून उपकार करून घेण्याचा प्रसंग चुकूनसुद्धा न येवो."

बापापेक्षा मुलगा, गुरुपेक्षा शिष्य आणि देवापेक्षा भक्त सवाई कर्तबगारीने चमकावा हे राष्ट्राच्या जितेपणाचे लक्षण. धन्य तशी इच्छा करणारे स्वामी व धन्य त्यांचे दास.

❀ ❀ ❀

## ३३. आनंदे भीमदर्शने

रामावतार संपला. मारुती कदलीवनात येऊन रामचिंतन करीत राहिला. द्वापारयुग अवतरले. कौरवांची राजवट आणि कृष्णावतार यांचा कालखंड तो! पांडव होते काम्यक वनात! वाऱ्यावरून वाहात वाहात एक सुंदर, सुगंधी आणि सतेज (कमल) फूल द्रौपदीच्या पुढे येऊन पडले. ते तिने उचलले. वेणीत माळायला

अशीच फुले आणा, असे तिने भीमाला विनवले.

भीम ताबडतोब उठला. जिकडून फूल आले होते, त्या दिशेने चालू लागला. रस्ता खराब असला म्हणून काय झाले? ठिकाण गाठायचे एवढेच प्रवाशाला ठाऊक!

पण वाटेतील कदलीवनात एक भेटला हुपट! त्याने शेपटी पसरून सारी वाटत अडविली होती.

"विघ्ने पुनः पुन्हा जरि आणिति अटकाव आणि छळतात।
उत्तम जन सोडिति ना, सुरू केले काम धरूनि हातात॥"

याप्रमाणे भीम धिटाईने पुढे झाला व म्हणाला, "वानरोबा, आपले शेपूट जरा आवरा की!"

तो वानर विव्हळत म्हणाला, "भीमा, मी थोडा आजारलो आहे रे! माझी शेपटी हाताने बाजूला करून, तूच जाईनास का आपल्या वाटेने?"

भीमाने एक हात लावला, शेपटी हालेना. दोन हात लावले, तरी ढीम नाही. मग भीमाने कंबर कसली अन् सारी पहिलवानकी पणाला लावली. समुद्रावर सेतुबंधन करून वानरसेना लंकेला पोहोचली होती, तसा पराक्रम करण्याचे भीमाने मनात आणले. पण छे! सगळेच मुसळ केरात! तेव्हा भीमाच्या लक्षात आले की, 'चिरंजीव होऊन राहिलेला वानर, तो रामावताराचा मारुती, तोच तर हा नसेल?'

मनात आले मात्र! भीमाने निरखून पाहिले. ओळख पटली. हात जोडून भीम म्हणाला, "वाऱ्यालाही मागे टाकणाऱ्या पुण्य पुरुषा, नकळत माझ्या हातून घडलेल्या अवमानाची क्षमा कर."

मारुती म्हणाला, "भीमा, यात क्षमा करण्याचे कारणच काय? तू तर माझा धाकटा भाऊ. पण तुला आपल्या बलदंडामुळे 'ग' ची बाधा झाल्याची मला शंका आली. म्हणून जरा गंमत करून तुला धडा दिला. अरे, शहाण्यांनी आणि शक्तिमानांनी विनयशीलच

असावे," असे म्हणून मारुतीने भीमाला मिठी मारली.

भीमाला आनंद झाला. तेव्हा मारुती म्हणाला, "हे पाहा, रामांच्या कार्यासाठीच मला रामांनी चिरंजीव केले आहे. दुष्टांचे पारिपत्य व सुष्टांचे संरक्षण हेच ते काम. कौरवांचा काटा काढणे अवघड नाही. पण तुम्ही पांडवांनी आरंभलेल्या कामात आम्ही नाही लुडबुड करणार. तरुणांना साहाय्य करावे, पण त्यांच्या कामात आपले शहाणपण मिरवायला जाऊन अनुभववृद्धांनी टेंभा मिरवू नये. म्हणून तुझा थोरला भाऊ म्हणून सांगतो की रणांगणावर तुझी भीमगर्जना झाली की, अर्जुनाच्या रथावरील ध्वजावरून मीही भुःभुःकाराने कौरवांना भेदरवीन आणि अर्जुनाचा तोरा कमी पडू देणार नाही." भीमाचे डोळे कृतज्ञतेने भरून आले.

मारुती मग म्हणाला, "भाऊराया, इतके भावनेला वश होऊन, भविष्यासाठी वर्तमानातील कर्तव्य डावलायचे नसते. तू द्रौपदीसाठी सुगंधी फुले आणायला चालला आहेस ना? जा. असाच पुढे, मिळतील तुला हवी ती फुले."

नमस्कार करून भीम पुढे गेला.

❀ ❀ ❀

## ३४. गरुड हनुमंत पुढे उभे राहती!

मारुती फिरत फिरत एकदा द्वारकेजवळ आला. तोंडी रामनाम, हाती सज्जनांच्या संरक्षणाचे काम, एवढेच मारुतीस ठाऊक होते. बागावनातील हाती लागतील ती फळे ही त्याच्या जीवनिकेची साधना.

एक दिवस हे कृष्णाच्या लक्षात आले. त्यानी गरुडाला बोलावले. आज्ञा केली की, "द्वारकेच्या बागा-बागांतून एक वानर हुंदड्या मारीत असतो. त्याला पकडून आण."

बलराम म्हणाले, "जमत असेल तर एकट्याने पकडून आण नाहीतर सेनासुद्धा वापर."

गरुडाला वाटले की, एक साधारण वानर पकडायला हवी कशाला सेना? सुईने काम भागेल तेथे सूळ का वापरा?

गरुड एकटाच गेला. त्याला पाहताच मारुती पाठ फिरवून बसला आणि फळे खाऊ लागला. तोंडाने रामनामाचा गजरही करीतच होता. गरुडाने मारुतीला प्रथम कोतवाली कुर्ऱ्याने गुरकावले. पण मारुती हूं की चूं करीना! मग गरुड म्हणाला, "ही बलरामांची बाग आहे. येथून चालता होतोस की दाखवू इंगा?"

तेव्हा मारुती मान वळवून म्हणाला, "आपण दाशरथी रामाशिवाय दुसरा राम ओळखतच नाही! बलराम कोण बुवा?"

मग गरुड काय गप्प बसतो? तो धावलाच मारुतीच्या अंगावर. अंगाखांद्यावर पोराला खेळवतात, तसे गरुडाला मारुतीने प्रथम खेळवले. गरुडाला उमजेना. तेव्हा मारुतीने त्याला शेपटीचा तडाखा दिला. तसा सीधा होऊन गरुड म्हणाला, "वानरश्रेष्ठा, आजकालचा युगपुरुष श्रीकृष्ण आहे, त्याने तुला बोलावले आहे."

"मी इतिहासजमा युगपुरुषाचा दास! आजच्या युगपुरुषाची सेवा माझ्या हातून कशी होणार?"

तशी गरुडाची स्वारी चवताळलीच! दोन ठोसे देऊन त्याने मारुतीवर चढाई केली. तेव्हा मारुतीने त्याला अलगद उचलला अन् भिरकावला समुद्राकडे! कसा झाला तरी नवीन युगपुरुषाचा तो दास होता ना?

समुद्रात गटांगळी मिळाली आणि गरुडाला भ्रमू लागले. टकमक टकमक करता करता शेवटी द्वारका कोठे आहे ते त्याच्या लक्षात आले. शेवटी द्वारकेस जाऊन झालेली सर्व कथा गरुडाने कृष्णास सांगितली.

कृष्ण म्हणाले, "गरुडा, परत त्या मारुतीकडे जा. त्याला राम

बोलावताहेत असे सांग."

झाली होती ती शोभा काय कमी होती? गरुडाची कशी छाती होणार मारुतीला भेटायची? पण धन्याची आज्ञा! मानलीच पाहिजे. त्याने बेत केला की, एकदम झडप घालून मारुतीला पाठीवर टाकावे आणि आणून उभा करावा त्याला कृष्णापुढे!

पण ऐनवेळी तसे घडले नाही. गरुडाने चार हात लांब राहूनच मारुतीला सांगितले की, "तुला प्रभू रामचंद्रांनी बोलावले आहे, चल माझ्याबरोबर!"

"हा मी आलोच! तू हो पुढे!" मारुती म्हणाला. गरुड उडाला पण पाहतो तो त्याच्या अगोदरच मारुतीची स्वारी द्वारकेत हजर झालेली दिसली!!

❀ ❀ ❀

## ३५. कृष्ण-मारुती भेट

गरुडाच्या अगोदर मारुती आला खरा, पण आपण जणू अयोध्येलाच आलो आहोत असे समजून स्वारी द्वारकेच्या वेशीत शिरू लागली. तसे त्याला कोण जाऊ देणार? भगवान श्रीकृष्णाचे सुदर्शनचक्र आडवे आले आणि म्हणाले, "मी नाही तुला जाऊ देणार!"

"परमात्म्याच्या दर्शनाच्या आड येतोस काय?" असा मारुतीने सवाल केला आणि त्या चक्राला तोंडात घातले मग काय?

राबता खुलाच झाला! सरळ द्वारकाधीशाच्या दरबारात जाऊन मारुती उभा राहिला. तेथे त्याला कृष्णरूपात रामदर्शन मिळाले, पण न्याहाळून पाहिले तरी त्याला सीतामाई आढळेना! तेव्हा भगवंतांच्या चरणाला वंदन करून मारुतीने विचारले, "देवाधिदेवा,

सीतामाई कुठे दिसत नाहीत त्या? त्यांच्या जागी या कोण? आपले एकपत्नीव्रत मला रामरूपाने दर्शन देताना तरी सुटले कसे? अनंतलीलाधरा मला समजवा.''

कृष्ण बोलताहेत कशाला? सीतेच्या जागी बसलेली रुपगर्विता सत्यभामा लाजलीच लाजली! तेव्हा मग भगवंतांनी विचारले, ''मारुते, तुला येताना कोणी अडविले कसे नाही? मी अयोध्येतला राम असलो तरी द्वारकेत कृष्ण आहे.''

''मला सर्व जगात रामरूपच दिसते. मला येथे येताना अडविणारे हे घ्या आपले सुदर्शनचक्र. त्याला मी दाढेखाली घातले होते.'' चक्र अगदी मऊ पडले होते.

इतक्यात गरुडाची स्वारी धावत धावतच तेथे आली. कृष्ण-मारुती भेटीचा तो सोहळा पाहून गरुड खजीलच झाला होता. त्याने हनुमंतासह भगवंतांना साष्टांग नमस्कार घातला. मग कृष्ण मारुतीला म्हणाले, ''सेवाधर्म परम गहन! पण तू त्याची मूर्ती. तेव्हा आता द्वारकेच्या पूर्वद्वारावर ठाण मांड, द्वारकापुरीचे रक्षण कर आणि आमच्या मंडळींना कित्ता घालून दे. सांगोवांगीपेक्षा सोबत व वळण खरेच श्रेष्ठ!''

❀ ❀ ❀

## ३६. ध्वजरक्षक मारुती

'कौरव पांडव-संगर तांडव' अटळ ठरले. एके दिवशी श्रीकृष्ण व अर्जुन यमुनातीरी चर्चा करीत बसले होते. ''समुद्रावर रामांनी बाणांचा पूल का बांधला नाही?'' अर्जुनाने विचारले.

''रामाने बाणांचा पूल बांधला असता. पण चौदा पद्मे वानर त्याच्यावरून गेले असते तर तो टिकला असता का?''

''काय सांगता देवा? मी बाणांचा अभेद्य पूल बांधून दाखवतो!

मग रामाला काय ते अशक्य होते?"

"आपण मारुतीचीच साक्ष घेऊ. तू बाणांचा पूल या यमुनेवरच बांधून दाखविनास का?"

अर्जुनाने यमुनेवर बाणांचा पूल बांधला. कृष्णांनी मारुतीला बोलावले. मारुती येताच कृष्ण म्हणाले, "अर्जुनाच्या पुलावरून पलीकडे जाऊन ये. आणि लंकेच्या सेतूइतका तो बळकट आहे की नाही, सांग."

मारुती तयार होईना. त्याच्या मते तो पूल दुबळा होता. पण अर्जुन म्हणाला, "हजार मारुती पुलावरून गेले तरी पूल अढळ राहील."

मग काय, मारुती थांबतोय? त्याने पुलावर दोन पावले टाकताच पूल कडाडला. अर्जुन ओशाळला. कृष्ण म्हणाले, "अरे, कोठे काही चुकले असले तर अजून दुरुस्ती कर."

अर्जुनाने पूल नीटनेटका केला. मारुती म्हणाला, "देवा, हा काय पोरखेळ आहे? या शक्तिपरीक्षेत जो हरेल त्याने दुसऱ्याची सेवा करायची ही अट कबूल आहे का?"

"ठीक ठीक!" कृष्ण म्हणाले. मारुती पुलावर चढणार, इतक्यात कृष्णांनी अर्जुनाच्या पुलाखाली आपले सुदर्शन ठेवले. मारुती पुलावरून जाऊ लागला. उड्याही मारल्या. त्या दणक्यातही अर्जुनाचा पूल टिकला. मारुती मोकळ्या मनाने म्हणाला, "देवा, मी हरलो. अर्जुन सांगेल ती सेवा मी करीन."

अर्जुन काहीच बोलला नाही. कृष्णच म्हणाले, "आता कौरव-पांडवांचे युद्ध अटळ झाले आहे. त्या युद्धाच्या वेळी, मारुते, तू अर्जुनाच्या ध्वजाचे रक्षण, त्याच्या रथावर बसून कर."

मारुतीने मान डोलावली म्हणाला,"अगदी माझ्या मनातलेच आपण सांगितलेत. बंधुवर्य भीमाला मी ती सेवा करण्याचे वचनच देऊन चुकलो आहे."

दोन्ही मोठी मने एकाच ध्येयसिद्धीसाठी रामप्रवाही असतात हेच खरे.

❀ ❀ ❀

## ३७. श्रेय मारुतीचेच!

भारतीय युद्धात एकदा कर्ण व अर्जुन यांचा घनघोर संग्राम झाला. त्यात अर्जुनाच्या बाणांनी कर्णाचा रथ तीन ताड मागे जाई, कर्णाच्या बाणांनी अर्जुनाच्या रथाला डोलसुद्धा येत नसे. एकदा मात्र कर्णाच्या बाणाने अर्जुनाचा रथ मुंगीच्या पायाइतका मागे सरला. अर्जुनाचा सारथी भगवान श्रीकृष्ण उद्गारला, "भले बहादूर!"

अर्जुनाला वाटले हे काय? परगुण परमाणू पर्वतासारखे वाखणणे हे आपआपसांत ठीक आहे, पण समोरच्या शत्रूचे कौतुक कृष्णांनी करावे? त्याने मग सरळ कृष्णालाच प्रश्न विचारला. भगवान म्हणाले, "शत्रूच्या गुणांचीही कदर आपल्याजवळ असली पाहिजे. सामना चालू असता ती मनात ठेवावी. स्वतःचा अवसानघात करून शत्रू शेफारेल असे करू नये. त्याचबरोबर आपलेही अवसान काय, याचा बरोबर हिशेब माणसाजवळ हवा. अर्जुना, तुझा रथ कर्णाच्या बाणांनी डळमळत नाही, याचे कारण त्याची बांधणी अगर तुझे रणकौशल्य कर्णाच्या बाणांना पुरून उरेल असे आहे, असेच ना तुझे मत?"

"हो, तर दुसरे काय?" अर्जुन म्हणाला.

"साफ खोटे आहे ते. तुझ्या रथाच्या ध्वजावर वज्रहनुमान मारुती नसता, तर आपली धडगत होती का? जे श्रेय मारुतीचे, ते तू उपटू नकोस व अकारण मोठेपणा स्वतःकडे घेऊ नकोस. 'महाबळी प्राणदाता मारुती' हीच तुझी कर्णाविरुद्ध आधारशक्ती आहे. अशाही स्थितीत रतिमात्र तुझा रथ कर्णाने मागे सारला,

म्हणून मी त्याला धन्यवाद दिले व तुला जागा केला. समजलास?"

त्याचा अनुभव शेवटी अर्जुनासही आला. महायुद्ध संपले, मारुतीने अर्जुनाच्या रथावरून उडी मारली आणि रथाचे काय झाले? तो खाक झाला व मातीला मिळाला.

अर्जुनाचे डोळे मारुतीबद्दलच्या कृतज्ञतेने भरून आले?

❀ ❀ ❀

# ३८. जय श्री हनुमान्!

श्रीकृष्णाचा मुलगा प्रद्युम्न दिग्विजयास निघाला होता. द्वारकेत अश्वमेध व्हावयाचा होता ना? प्रद्युम्न हिरण्मय खंडात आला. बरोबर अर्जुन होताच. त्याच्या ध्वजावर मारुतीही होताच.

हिरण्मय खंडात नल-नील यांच्या वंशजांशी गाठ होती. त्यांनी प्रद्युम्नाचा व अर्जुनाचा रथही आपल्या वज्रपुच्छांनी वेढून जमीनदोस्त केला.

मग मारुतीला कसे राहवणार? अर्जुनाच्या ध्वजावरून मारुतीने उडी ठोकली आणि स्वतः लढाईसाठी दंड थोपटले. हिरण्मय खंडाच्या वानरांनाच मारुतीने आपल्या शेपटीने गुंडाळले व धूळ चारली. 'जशास तैसा जेव्हा भेटे। तेव्हा मजालसी थाटे।।'

हिरण्मय खंडाच्या वानरास कळून चुकले की 'ज्या गावच्या बोरी, त्याच गावच्या बाभळी' दाखविणारा तो वीर मारुती आहे. मग काय? त्यांनी आपल्या त्या थोर वीरग्रणीची पूजा आरंभिली. 'पुष्पसंगे मातीस वास लागे।' असा अनुभव सगळीकडेच येतो. मारुतीबरोबर अर्जुनाचा व प्रद्युम्नाचाही सत्कार झाला.

❀ ❀ ❀

# जय बजरंग

## पु. पां. गोखले

भीमरुपी महारुद्रा वज्रहनुमान मारुती ।

वनारी अंजनीसूता रामदूता प्रभंजना ।।

आपल्या बाल वयातच सूर्याकडे झेप घेण्याचा पराक्रम करणारा मारुती हा वाऱ्याचा म्हणजे पवनपुत्र. शक्ती, बुध्दी आणि चातुर्य हे गुण अंगी असलेल्या हनुमानाने रामायणात राम-रावण युध्दात अतुलनिय पराक्रम केला. हनुमानाची श्रीरामावर फार भक्ती. आपली छाती फाडून त्याने सर्वांना श्रीरामाचे दर्शन घडविले.

मारुतीच्या पराक्रमाच्या, चातुर्याच्या कथा तुम्हाला या पुस्तकात वाचावयास मिळतील. त्या कथांपासून आपण स्फूर्ती घेऊ या आणि रामभक्त हनुमानाप्रमाणे आपणही बलवान होऊ या.